# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, ८ नोव्हेंबर २०२३

⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⊙ मराठी ⊙ दैनिक

⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ९३

⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 8 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-93 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-5


## दिवाळीची चाहूल



वर्षातील सर्वांत मोठा सण म्हणले दीपावली. अवघ्या एक दिवसावर येऊन ठेपलेल्या या सणाची घरोघरी लगबग सुरू झाली. आकाशदिवे प्रकाशमान होऊ लागले...! छायाचित्र : सुधीर कोर्टीकर

# आरक्षणप्रश्नी एकवाक्यता नाही

## नाना पटोले : सरकारने भूमिका स्पष्ट करावी

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : मराठा व ओबीसी समाजात तेढ निर्माण करुन राज्यात सामाजिक अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. सरकारमधील दोन मंत्रीच आरक्षणावर वेगवेगळी विधाने जाहीरपणे करत आहेत. सरकारमध्ये एकवाक्यता दिसत नाही त्यामुळे आरक्षणाप्रश्नावर भाजपा व शिंदे सरकारने भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.**



टिळक भवन येथे प्रसार माध्यमांशी बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले पुढे म्हणाले की, ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण द्यावे अशी भूमिका सर्व पक्षिय बैठकीत मांडण्यात आली होती पण तसे होताना दिसत नाही. दोन जातींमध्ये तणाव निर्माण करून राज्याला भेडसावत असलेले महागाई, बेरोजगारी, दुष्काळ, शेतकरी आत्महत्या, ड्रग्जची तस्करी या मुळ मुद्द्यांपासून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी वातावरण बिघडवले जात आहे. मराठा, धनगर समाजाला आरक्षण देण्याचे आश्वासन देऊन त्यांच्या मतांवर भाजपा सत्तेत आला पण त्यांना आरक्षण दिलेच नाही. मराठा आरक्षणाविरोधात बाजू मांडू नका असे तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच सांगितले होते असे त्यावेळी सरकारची बाजू न्यायालयात मांडणारे महाधिवक्ता आशितोष कुंभकोणी यांनीच सांगितले आहे. आरक्षणाविरोधात ज्या लोकांनी न्यायालयात याचिका दाखल केल्या, त्यांच्यामागे कोण आहेत हे राज्यातील जनतेला माहित आहे. भारतीय जनता पक्ष हा आरक्षणविरोधी आहे, त्यांना आरक्षण संपवायचे आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्वतःच गरिब ही जात आहे असे सांगत आहेत, गरिब व श्रीमंत या दोन जाती ठरवून गरिब जनतेला शैक्षणिक, आर्थिकदृष्ट्या कमजोर करुन गुलाम बनवण्याचा मनुसुबा आहे. भाजपाचा हा मनसुबा मात्र कधीच यशस्वी होणार नाही. मागास जातींना आरक्षण दिले पाहिजे ही काँग्रेस पक्षाची भूमिका आहे. आरक्षण प्रश्नी आज तो वाद सुरु आहे त्यातून मार्ग काढायचा असेल तर, जातनिहाय जनगणना करणे व आरक्षणाची ५० टक्के मर्यादा हटवणे गरजेचे आहे. राहुल गांधी यांनी ही भूमिका देशभर मांडली आहे पण केंद्रातील भाजपा सरकार मत्र यावर निर्णय घेत नाही कारण भाजपा हा आरक्षण विरोधी पक्ष आहे. बीडमधील जाळपोळीवर बोलताना नाना पटोले म्हणाले की, राज्यात कायदा सुव्यवस्था बिघडलेली आहे. गृहखाते कमी पडत आहे हे स्पष्ट दिसत आहे. बीडमध्ये जी जाळपोळ करण्यात आली त्यामागे कोणतीतरी शक्ती असल्याशिवाय शक्य नाही. कोणतरी राजकीय फूस लावल्याशिवाय अशी जाळपोळ होत नाही. या सर्व प्रकारामागे सरकारचा हात असू शकतो असे पटोले म्हणाले. कुणबी प्रमाणपत्राबद्दल बोलताना पटोले म्हणाले की, सरकार मराठा समाजाची फसवणूक करत आहे. जात प्रमाणपत्र देताना फॅमिली ट्री लागतो तरच असे प्रमाणपत्र देता येते, सरकार आज जे करत आहे ती तात्पुरता व्यवस्था आहे कायमस्वरूपी नाही. या पत्रकार परिषदेला माजी मंत्री व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान उपस्थित होते.

**मराठा आरक्षण ओबीसीतून देण्याला आमचा विरोध : संग्राम माने**

मराठा समाजाला आरक्षण देण्यास आमचा विरोध नाही, मात्र, कुणबी दाखले देउन मराठा समाजाला कोणत्या वर्गातून आरक्षण शासन देणार हे स्पष्ट करावे, जर ओबीसी कोट्यातून आरक्षण देणार असाल तर आमचा विरोध राहील, असे महाराष्ट्र ओबीसी व्हीजेएनटी बहुजन परिषदेचे सरचिटणीस संग्राम माने यांनी मंगळवारी विटा येथे सांगितले . माने म्हणाले, सध्या राज्यात सरसकट मराठा समाजाला कुणगी प्रमाणपत्र देण्याच्या हालचाली सुरू आहेत . मराठा समाजातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्यांना शिक्षण, नोकरीत आरक्षण मिळण्यास विरोध नाही . मात्र, ओबीसी समाजाने पन्नास वर्षे संघर्ष करून आरक्षण मिळवले आहे . त्या कोट्यातूनच जर मराठा समाजाला आरक्षण देण्याचा प्रयत्न झाला तर हा ओबीसीवर अन्याय ठरेल . हे आमचा समाज मान्य करणार नाही . यासाठी पुन्हा संघर्ष करावा लागला तर यासाठी आमची तयारी आहे .

# पुणे शहरात साखळी बॉम्बस्फोटाचा कट


आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** शहरात साखळी बॉम्बस्फोट घडविण्याच्या कट दहशतवाद्यांनी रचला होता. आयसिसच्या महाराष्ट्र गटातील दहशतवाद्यांना सिरीयातून याबाबतच्या सूचना मिळाल्याची धक्कादायक माहिती तपासात उघडकीस आली आहे. राष्ट्रीय तपास यंत्रणेने मोहम्मद शाहनवाज आलम याला नुकतीच अटक केली. एनआयएने सहा दिवसांपूर्वी कोढव्यातू पसार झालेला दहशतवादी मोहम्मद शहानवाज आलम उर्फ शफिकूर रहमान आलम याला अटक केली. त्याच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल करण्यात आले नाही. आलमला एनआयएच्या कोठडीत ठेवण्याचे आदेश देण्यात आले. आलमची एनआयच्या पथकाने चौकशी केली. तेव्हा पुण्यात साखळी बाँम्बस्फोट करण्याचा कट रचला होता. दहशतवादी विचारधारेचा प्रसार, तसेच तरुणांची माथी भडकावून त्यांना दहशतवादी कारवायांमध्ये ओढणाऱ्या आयसिसच्या महाराष्ट्र गटाकडून पुणे, मुंबईसह देशभरात कारवाया करण्याचा कट रचला होता. अटक करण्यात आलेल्या सात दहशतवाद्यांकडून राष्ट्रीय तपास यंत्रणेने मुंबईतील विशेष न्यायालयात नुकतेच आरोपपत्र दाखल केले. मोहम्मद इम्रान मोहम्मद युसुफ खान उर्फ मटका उर्फ अमीर अब्दुल हमीद खान, मोहम्मद युनुस मोहम्मद याकुब साकी उर्फ आदिल उर्फ आदिल सलीम खान, कादीर दस्तगीर पठाण उर्फ अब्दुल कादीर, समीब नासीरउद्दीन काझी, जुल्फीकार अली बडोदावाला उर्फ लालाभाई उर्फ सईफ, शामिल साकीब नाचन, अकिफ आतिफ नाचन अशी आरोपपत्र दाखल केलेल्या दहशतवाद्यांची नावे आहेत.










विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932




आधुनिक केसरी

' सा रे ग म ' चे स्वर या खांबांना छेडले की ऐकू येतात. या रहस्याचा शोध घेण्यासाठी संशोधकांनी दोन खांबांचे उत्खनन करून पाहिले पण त्यातील रहस्य त्यांना समजू शकले नाही. या मंदिराचे प्रमुख आकर्षण असलेला एक भव्य दगडी रथ या मंदिराच्या प्रांगणात आहे. सुमारे ३० ते ३५ फूट उंच असलेला हा रथ आपले लक्ष वेधून घेतो. त्यावरील नजर हटत नाही इतके सुंदर कोरीव काम त्यावर केले आहे. रथाची दगडी चाके, त्यावरील अप्रतिम कोरीव नक्षी, रथाचा मध्यभागी असणारा दगडी आस किंवा आरी, रथाच्या अग्रभागी असणारे दोन दगडी हत्ती, रथाच्या मध्यात असणारी दगडी पण लाकडाचा भास होणारी शिडी हे सगळेच अप्रतिम ! एके काळी हा रथ फिरवीत असत असे सांगितले जाते.
हंपीतील उग्र नरसिंह मंदिर मूर्तिकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. जवळपास वीस ते बावीस फूट उंच अशी नरसिंह मूर्ती आहे. आक्रमकांनी मूर्तीचे हात तोडलेले दिसतात. पण मूर्ती अतिशय विशाल आणि सुंदर आहे. मूर्तीच्या समोरच एक विशाल अखंड पाषाणातून घडवलेले शिवलिंग आहे. त्याच्या तळाशी कायम पाणी असते.
हंपीत राहून पाहावीत अशी अनेक सुंदर स्थळे आहेत. हंपीत फिरताना तुंगभद्रा नदीचे मनोरम दर्शन जागोजागी होते. जवळच एका टेकडीवर अंजनेय हनुमानाचे मंदिर आहे. हे हनुमानाचे जन्मस्थान समजले जाते. याच ठिकाणी श्रीराम आणि हनुमानाची भेट झाली होती असे सांगितले जाते. जवळच एका टेकडीवर जैन मंदिरांचा समूह आहे. आपण बघू तेवढे कमी आहे. येथे पर्यटकांसाठी अनेक हॉटेल्स आहेत. अशाच एका आगळ्यावेगळ्या हॉटेलात आम्ही भोजनाचा आस्वाद घेतला. त्याचे नाव मँगो ट्री रेस्टॉरंट. यात आपल्याला बसण्यासाठी भारतीय पद्धतीची बैठक व्यवस्था आहे. वेळ असेल तर वाचण्यासाठी काही पुस्तके देखील ठेवली आहेत. शाकाहारी पद्धतीचे केळीच्या पानावर वाढलेले उत्कृष्ट जेवण येथे मिळते.



## आनंदी पहाट

# निःस्वार्थ प्रेमाची जाणीव होणे आवश्यक

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

प्रेमाची परिभाषा समजण्यासाठी अगोदर त्या प्रेमाची अनुभूती घ्यावी लागत असते. प्रेम दिल्याशिवाय ते मिळतंच असं नाही. अनेकदा ते मिळत नाही म्हणून दिलंही जात नाही. प्रेमामध्ये त्याग महत्वाचा असतो, तोच अनेकदा नको असतो. प्रेम हे काही केवळ एक स्त्री-पुरुष ह्यांच्या परस्परांतील असतं असं नाही. आपलं अंतर्मन हे खरं तर प्रेमाचं प्रतिबिंब असावं, त्या प्रतिबिंबित छबीदार रूपांत दडलेल्या प्रेमाचा साक्षात्कार व्हावा लागतो. प्रेमाची परिभाषा आर्थिक प्रमेयाशी जोडली जात असल्याचं खेदजनक चित्र अनेक ठिकाणी आपल्याला दिसत असतं. प्रेमामध्ये शब्दांपेक्षा भाव-भावनाच अधिक महत्वाच्या असतात. निस्वार्थी प्रेमाची जाणीव असणं जरुरीचं असतं.
जीवनाचं खरं सार आपण दुसऱ्यांना, इतरांना देत असलेल्या आणि आपल्याला मिळत असलेल्या प्रेमांत सामावलेलं असतं. प्रेमासाठी तन अथवा धन नाही तर मन महत्वाचं असतं, ह्याची जाणीव सतत ठेवणं जरुरीचं असतं. प्रेमाच्या प्राप्तीचीच अनेकदा उणिव असल्याचं दिसतं, त्यामुळेच समूहामध्ये, घोळक्यात, गर्दीत देखील एखादी व्यक्ती स्वतःला एकटं समजत असते. त्याउलट प्रेमाचा वर्षाव होत असलेल्या व्यक्तीला एकटे असताना देखील मानसिक एकलेपण जाणवत नाही. तेच खरं जीवनातलं सार आहे. आपल्या मनांत येत असलेल्या प्रत्येक विचाराचा परिणाम कमी अधिक प्रमाणांत आपल्या मानसिकतेवर होत असतो. नकारात्मक विचारांचा विपरीत परिणाम होत असतो, तर सकारात्मक विचार यशप्राप्तीसाठी उपयुक्त ठरतात. आपल्या प्रत्येक कृतीपूर्वी विचार होण्याची जरुरी असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक विचारांचा माध्यम म्हणून उपयोग करण्याची आपल्याला सतत जाणीव होणं आवश्यक असतं.



आधुनिक केसरी

**मन होई दंग | हरिनामे ||**

अंतरीच्या कळा | नको दावू जना ||
सोसावी वेदना | मनोभावे ||१||
मान पान सारे | विकारांचे खेळ ||
घाल ताळमेळ | स्वरूपाशी ||२||
अंतरीची साद | ऐकावी एकांती ||
नको भटकंती | फुका मना ||३||
निष्काम कर्माचा | महिमा अगाध ||
आनंदे निनाद | चैतन्याचा ||४||
अंतरीचा धावा | ऐकता श्रीरंग ||
मन होई दंग | हरिनामा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी

नानाव्याधीचे उमाळे ।तेणें दुःखें आंदोळे ।
रडे पडे कां पोळे ।अग्निसंगें ॥७॥
शरीर रक्षितां नये ।घडती नाना अपाये ।
खोडी अधांतरीं होये ।आवेवहीन बाळक ॥८॥
अथवा अपाय चुकले ।पूर्णपुण्य पुढें ठाकलें ।
मातेस ओळखों लागलें ।दिवसेंदिवस ॥९॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

सब वन में चन्दन नहीं, मणि सब गज नहिं होय। साधव नहिं सब देश में, दुर्लभ दर्शन सोय ।।२०।।(स्वर्वेद तृतीय मण्डल अष्टम अध्याय) ०३/०८/२०

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
सर्व वनांत चंदन नसते. सर्व हत्तींमधे गजमुक्ता मणी (ज्याच्या गंडस्थळात मणी म्हणजेच मोती आहे असा हत्ती) नसतो. तसेच सर्व स्थानी संत नसतात. संतांचे म्हणजेच सद्गुरुंचे दर्शन दुर्लभ आहे.



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

.......................................................................

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## शारदीय नवरात्र (माळ नववी)

आधुनिक केसरी

देवी प्रसन्न झाली की. परमात्मा स्वरूप प्रसन्नतेचे फळ मिळते. तुझ्या कोपाने कुटूंबे धुळीस मिळाली आहेत. पण असे का होते? तर असत्य वागणे,मानव धर्माचे पालन न करणे,हिंसक, कुरघोडी करण्याचा स्वभाव मातेला आवडत नाही. म्हणून मित्रांनो, आजपासून आपण एक संकल्प करूया की मातेला जे जे आवडतं तसंच वागायचं !!!!बघा मित्रांनो तुम्हालाचं तुमच्यामध्ये झालेला बदल जाणवू लागेल.माता ज्यांच्यावर प्रसन्न असते ते या देशाच्या सर्वोच्च पदाला पात्र असतात. पण सदाचाराने वागणे हा एकमेव संस्कार आपल्या जवळ असणे गरजेचे आहे.सत्य ,धर्माचरणात जीवन जगणे सतत सत्वगुणांने रहाणे हे गुण ज्यांच्याकडे आहेत ज्यांना यश,धनाचा लोभ होत नाही अशा लोकांच्या वर देवीमाता प्रसन्न असते. त्यांची किर्ती वाढते. देवीचे सन्मानीय भक्त कधीच धर्माचरण सोडून वागत नाहीत. धर्माच्या चौकटीत राहूनच जीवन जगले पाहिजे.हे ज्ञानगुणी लोकांना माहीत असते.अनाचारा कडे पाठ केली पाहिजे पाश्चिमात्य संस्कृतीशी जवळीक करू नये.




सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# नामस्मरणापरते दुसरे हित नाही

आधुनिक केसरी


एक गृहस्थ मला भेटले. ते म्हणाले, "मला देव पहावासा वाटतो. तुम्ही पाहिला आहे का ?" मी म्हटले, "पाहिला आहे." त्यांनी विचारले, 'तो मला दिसेल का ?' मी म्हटले, "दिसेल, पण या डोळ्यांनी दिसणार नाही. देवाला पाहण्याची दृष्टी वेगळी आहे." आज आमची विषयाची दृष्टी आहे. ती भगवंताची नाही. आपल्याला भगवंत पाहायचा असेल तर त्याला एकच उपाय : भगवंताच्या नामात राहावे. नामाशिवाय दुसरा मार्ग नाही. सगळयांना माझे सांगणे आहे; हे ऐकणे अत्यंत जरूर आहे बरे ! ऐकणे कशासाठी ? तर मी बरोबर मार्गाने जातो आहे की नाही, ते कळण्यासाठी. पण नुसते ऐकून चालणार नाही; ऐकून कृती केली तरच साधेल. ती तुम्ही करा. आचरणात आणलेले तेवढेच कामाला येईल. सगळयांनी नामस्मरण करा. नामस्मरणासारखा कल्याणाचा दुसरा मार्ग नाही. जे सहज आपल्याजवळ आहे, अत्यंत उपाधिरहित आहे, जे कुणावर अवलंबून नाही, असे जर काही असेल तर ते भगवंताचे नाम आहे. तेव्हा शुद्धतेने, शुद्ध आचरणाने जो ते घेईल, त्याचे राम खरेच कल्याण करील.



आपल्या गुरूने जे सांगितले ते सत्य मानावे. "या मार्गाने शंभर पावले गेलास तर खजिना सापडेल." असे गुरूने सांगितले, तर दुसऱ्या मार्गाने दोनशे पावले जरी गेला तरी त्याचा काय उपयोग ? "मला सगुण साक्षात्कार व्हावा" असे म्हणतो, पण प्रत्यक्ष बोलणारा चालणारा सदगुरू पाहून समाधान होत नाही तर परमात्म्याचे दर्शन करून देऊन काय उपयोग ? आंबा हवा असेल तर कोय पेरल्याशिवाय कुठला मिळणार ? सदगुरूने जे सांगितले त्यापरते माझे काही हित आहे, हे मनातच येऊ नये. आपण खरोखरी सर्वस्वी त्याचे व्हावे. नामस्मरणापरते दुसरे हित नाही. माझ्या नामाने घरात आजारी पडलेला मनुष्य बरा व्हावा म्हणणे, म्हणजे त्या नामाचा विषयाकडे उपयोग नाही का केला ? बरे झाल्यावर ज्याप्रमाणे आम्ही बाटलीतले औषध टाकून देतो, त्याप्रमाणे गरज संपली की आम्ही देवाला विसरतो. अमुक एक घडावे असे जिथे वाटते तिथे साधनात कमतरता आली. एका सदगुरू वचनावर विश्वास ठेवला म्हणजे सुखदुःखाच्या गोष्टींचा मनावर परिणाम होत नाही. मोठा अधिकारी झाला तरी पोराबाळांबरोबर खेळताना ज्याप्रमाणे तो त्यांच्यासारखा होतो, त्या प्रमाणे व्यवहारात वागावे. आपण निर्लोभतेने वागावे. खेळात ज्याप्रमाणे आपण चुकू देत नाही, त्याप्रमाणे प्रपंचात करावे. प्रपंचाचा सहवास वरवरचा असावा. त्याचा वास आत नसावा. आत फक्त भगवंताचा वास असावा.

## समर्थ रामदास

आधुनिक केसरी



लहानपणी नारायण साहसी होता. झाडावरून उड्या मारणे, पुरात पोहणे, घोड्यावर रपेट करणे या सगळ्या गोष्टींत तो तरबेज होता. त्याचे आठ मित्र होते. एक मित्र सुताराचा मुलगा होता तर दुसरा गवंड्याचा. एक लोहाराचा तर दुसरा गवळ्याचा. नारायणाने या मित्रांच्या सहवासात बालपणीच त्या-त्या व्यवसायाचे उत्तम ज्ञान प्राप्त करून घेतले होते. निरीक्षणाने आणि अनुभवाने तो सगळ्या गोष्टी शिकला. एकदा नारायण लपून बसला, काही केल्या सापडेना. अखेर एका फडताळात सापडला. "काय करीत होतास" असे विचारल्यावर "आई,

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, ८ नोव्हेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari




# सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यास विरोध

## विजय वडेट्टीवार : मराठा आरक्षणाला विरोध नाही

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : महाराष्ट्रात मराठा आरक्षणाचा विषय चांगलाच चर्चेत आहे. याचे महत्त्वाचे कारण आहे ते म्हणजे मनोज जरांगे पाटील यांनी दोन वेळा केलेले उपोषण. तसेच मराठा आरक्षणासाठी मराठा बांधवांचे सुरु असलेले साखळी उपोषण आणि मनोज जरांगे पाटील यांनी सरकारला दिलेली २४ डिसेंबरपर्यंतची मुदत आहे. छगन भुजबळ यांनी बीडमध्ये सोमवारी पत्रकार परिषद घेऊन हे सांगितले की, आमचा मराठा आरक्षणाला विरोध नाही मात्र ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये. एकीकडे छगन भुजबळ यांनी ही भूमिका मांडली असताना राज्याचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनीही सरसकट कुणबी प्रमाणपत्राला आमचा विरोध आहे, असे म्हटले आहे.**

आरक्षणाची टक्केवारी वाढवून मराठा समाजाला आरक्षण दिले गेले पाहिजे. सरसकट आरक्षण देण्यास आमचा आधीही विरोध होता आणि आत्ताही आहे. कुणबी नोंदणीचे काम शिंदे समितीला दिले आहे. ओबीसींमध्ये समाविष्ट होणाऱ्या जाती त्यांनी शोधाव्या आणि श्वेतपत्रिका काढावी, असे विजय वडेट्टीवार म्हणाले.

आम्ही राणे समिती स्थापन केली होती. त्यानंतर गायकवाड समिती आली. सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे, की कोणतीही जात मागास ठरवायची असेल तर त्यासाठीची प्रक्रिया आहे. ती राबवली गेली पाहिजे. जर सिद्ध झाले की ते मागास आहेत तर त्यांना आरक्षण द्यायला कुणाचीच ना नाही. छगन भुजबळ एक भूमिका मांडत आहेत आणि शंभूराज देसाई वेगळे बोलत आहेत. असे असू नये, लवकरात लवकर हा प्रश्न मार्गी लावावा असेही विजय वडेट्टीवार म्हणाले.



महाराष्ट्रातील कुणबींच्या नोंदी तपासण्यात येत आहेत. आता जी मागणी येते आहे की सरसकट मराठा समाजाला आरक्षण द्या. यावर सरकारची भूमिका काय? ते स्पष्ट झाले पाहिजे. मराठा विरुद्ध ओबीसी अशी लढाई यांना लावायची आहे का? असाही प्रश्न वडेट्टीवार यांनी विचारला आहे. मी ओबीसी आहे मला हेच वाटते की ओबीसींच्या आरक्षणाला धक्का लागू नये. सरसकट कुणबी प्रमाणपत्र देण्यास माझा याआधीही विरोध होता आणि आत्ताही आहे. शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या विदर्भात होतात. ते कोण आहेत? ते ओबीसी आहेत. का होतात? कारण ओबीसीमुळे सर्व काही मिळते अशा पद्धतीचे वातावरण निर्माण केले गेले. अरे हेच समाजाला अपुरे आहे. तुम्ही येणार तर वाढवून घ्या. वेगळा प्रवर्ग घ्या. तुम्ही ५० टक्केच्या आतमध्येची मागणी करताय. हा निर्णय सरकारने जाहीर केला. मग वाढवून द्या. ओबीसी समाजाला दुखवू नका. मराठा समाजालाही दुखवू नका. गरीब मराठा समाजाला न्याय मिळावे, अशी आमचीदेखील भूमिका आहे. सरकार सरकार म्हणून जी भूमिका मांडायला हवे ती मांडताना दिसत नाही, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी यावेळी केली.

महत्त्वाची बातमी

## तर त्यांनी सुप्रीम कोर्टात आरक्षण टिकवले असते

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी 2019 मध्ये विद्यमान उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाला विरोध केला नसता, तर त्यावेळी देण्यात आलेले मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकावे यासाठी फडणवीसांनी सर्वोतोपरी प्रयत्न केले असते. त्यांनी मराठा समाजाला न्याय मिळवून दिला असता, असा दावा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. ते नागपुरात बोलत होते. अन्न आणि नगरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी मराठा आरक्षणाबाबत घेतलेल्या आक्रमक पवित्र्यानंतर, सत्ताधारी नेत्यांमध्येच वादावादी सुरु झाली आहे. मराठा आरक्षणाविषयी मतमतांतर दिसून येत आहे. अशातच भारतीय जनता पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी उद्धव ठाकरेंवर थेट आरोप केला. मराठा आरक्षणाचा घात करणारे खरे आरोपी उद्धव ठाकरे असल्याचा हल्लाबोल, बावनकुळे यांनी केला. उद्धव ठाकरे यांनी 2019 मध्ये फडणवीस यांच्या मुख्यमंत्रिपदाला विरोध केला नसता, तर फडणवीस यांनी सर्वोच्च न्यायालयात सर्व प्रयत्न करून मराठा आरक्षण टिकवले असते. मराठा समाजाला न्याय देण्यासाठी फडणवीसांनी प्रामाणिक प्रयत्न केले. मात्र उद्धव ठाकरेंच्या भूमिकेमुळे हा विषय अद्याप प्रलंबित आहे, असे असले तरी महायुतीचे सरकारच न्याय मिळवून देण्यासाठी वचनबद्ध आहे, असे बावनकुळे म्हणाले.



## यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने पाच हजार नागरिकांना आयुष्मान भारत कार्डचे वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** नागरिकांना उपचारासाठी पाच लाखांपर्यंत शासकिय मदत देण्यासाठी केंद्र सरकारच्या वतीने आयुष्यमान भारत योजना राबविण्यात येत आहे. यात जनगणना यादीत समाविष्ट असलेल्या जवळपास पाच हजार नागरिकांना यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने सदर योजनेचे कार्ड वितरीत करण्यात आले आहे. यंग चांदा ब्रिगेडच्या कार्यालयात सदर कार्ड वाटप सुरु असुन नोंदणीकृत नागरिकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहण यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने करण्यात आले आहे.

केंद्र सरकारच्या वतीने पंतप्रधान जन-आरोग्य योजना म्हणजे आयुष्यमान भारत योजनेची सुरुवात करण्यात आली आहे. ही जगातील सर्वात मोठी आरोग्य योजना आहे. या योजनेमूळे गरीब आणि मध्यम वर्गातील लाखो लोकांना 5 लाख रुपयांपर्यंतचे उपचार मोफत करता येणार आहे. केंद्र सरकारने ही योजना 23 सप्टेंबर, 2018 रोजी सुरु केली होती. या योजनेत किरकोळ उपचारापासून ते शस्त्रक्रियेचा लाभ रुग्णांना घेता येता येणार आहे. या योजनेतंर्गत लाभार्थ्यांना देशात सरकारी आणि खासगी रुग्णालयात उपचार घेता येतो. सदर योजने अंतर्गत रुग्णालयात दाखल झाल्यानंतर पुढील 15 दिवसांपर्यंत रुग्णांचा खर्च सरकारच्या वतीने करण्यात येणार आहे.

2011 च्या जनगणना यादीत समाविष्ट असलेल्या नागरिकांची सदर योजनेसाठी नोंदणी करण्यात आली आहे. या नोंदणीकृत पात्र नागरिकांना आयुष्यमान भारत योजनेचे कार्ड वितरीत करण्याचा उपक्रम यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने राबविण्यात येत आहे. 5 ऑक्टोबर पासून जैन भवण जवळील यंग चांदा ब्रिगेडच्या कार्यालयात सदर उपक्रम राबविल्या जात असून मागील एक महिण्यात पाच हजाराहून अधिक नागरिकांना कार्ड वितरित करण्यात आले आहे. सदर उपक्रम पूढील एक महिणा चालणार असून नोंदणीकृत नागरिकांनी कार्यालयात सुरु असलेल्या उपक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने करण्यात आले आहे.

## ३० नोव्हेंबरपूर्वी सादर करावा हयातीचा दाखला

### सेवानिवृत्त कर्मचारी व कुटुंब निवृत्तीधारक यांना मनपाचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** महानगरपालिकेतील सर्व सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी व कुटुंबनिवृत्तीधारक यांनी त्यांच्या हयातीचा दाखला ३० नोव्हेंबरपूर्वी मनपा लेखा विभागात सादर करण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

हयातीचा दाखला हा भारतीय स्टेट बँक चंद्रपूर येथील मुख्य शाखेतुन प्रमाणित केलेला असावा तसेच हयातीचा दाखल्यावर त्यांचा मोबाईल क्रमांक नमुद असणे आवश्यक आहे. सोबतच आधार कार्ड व पॅनकार्डची छायांकीत प्रत (झेरॉक्स) जोडण्यात यावी. हयात प्रमाणपत्र ३० नोव्हेंबर २०२३ पूर्वी मनपा लेखा विभागास प्राप्त न झाल्यास पुढील पेन्शन रोखण्यात येणार असल्याने दिलेल्या मुदतीत हयातीचा दाखला सादर करण्याचे आवाहन चंद्रपूर महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.



## शिंदेंचा भुजबळांना इशारा

आधुनिक केसरी

मंत्री छगन भुजबळ यांनी केलेल्या वक्तव्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देणे म्हणजे मागील दाराने ओबीसीमध्ये प्रवेश देण्यासारखे आहे, असे विधान मंत्री छगन भुजबळ यांनी केले होते. यावरून छगन भुजबळांवर टीका केली जात आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही छगन भुजबळांना अप्रत्यक्षपणे सूचक इशारा दिला आहे. कुणीही अन्य किंवा ओबीसी समाजात संभ्रम निर्माण करू नये, असे एकनाथ शिंदेंनी म्हटले आहे. ओबीसी समाजाला धक्का न लावता मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देण्याचा प्रयत्न सरकार करत आहे, असेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले, ओबीसी समाजाच्या बैठकीत देवेंद्र फडणवीस, अजित पवार उपस्थित होते. ओबीसी किंवा अन्य समाजाला धक्का न लावता मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देणार,' अशी भूमिका सरकारने मांडली होती. त्यामुळे कुणीही अन्य किंवा ओबीसी समाजात संभ्रम निर्माण करू नये. कुणबी दाखल्यावरून शिंदे समिती आरक्षण देण्याचा प्रयत्न करत आहे. तर, क्युरेटिव्ह पिटीशन माध्यमातून मराठा समाजाला न्याय मिळेल. मंत्री शंभूराज देसाई यांनीही छगन भुजबळांना सुनावले आहे. ओबीसी समाजाने कुठेही गैरसमज करून घेण्याचा प्रयत्न करू नये. ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कुठेही धक्का लावणार नाही. हे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. छगन भुजबळांनी अशाप्रकारची वक्तव्ये करून जाती-जातींतील लोकांमध्ये संभ्रम निर्माण करू नये, असे देसाईंनी म्हटले आहे. भडक वक्तव्य करण्याची सवय छगन भुजबळांना आहे. मुख्यमंत्र्यांनी राज्याची परिस्थिती व्यवस्थितपणे हाताळली आहे. सर्व प्रश्न सुटण्याच्या मार्गावर आहेत. अशातच भडक वक्तव्ये करून परिस्थिती भुजबळांनी परिस्थिती चिघळवू नये, असेही शंभूराज देसाईंनी म्हटले.

## भांडवलदारांनो, दिवाळीला गरिबाचा विचार करणार का ?



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**भारतीय हिंदु संस्कृतीमध्ये सण,उत्सवाला रूढी परंपरेनुसार महत्व प्राप्त झालेले असलं तरी अनादिकाळापासून सुरू असलेल्या उत्सवाचं स्वरूप बदलताना दिसतं. एक काळ असा होता सण उत्सवालाच करंज्या, लाडू मिळायच्या. पण ती परिस्थिती बदलली असुन बारामाही दिवाळी प्रत्येकाच्याच घरात साजरी होताना दिसते. आपआपल्या परीने उत्सव साजरे प्रत्येकजण करतात. दिपावली आनंद उत्सवाचा तथा स्वजीवन प्रकाशमय परिवर्तित करणारा उत्सव आपण समजु. भांडवलदार अधिक चांगल्या जोमाने साजरा करतो. पण त्यापेक्षा शेवटचा माणुस त्याच्या पद्धतीने साजरा करतो. गरीबी-श्रीमंतीची दरी अजुनही संपलेली नाही.**

त्यामुळे जे भांडवलदार किंवा श्रीमंत असतात त्यांनी उत्सवाच्या पार्श्वभुमीवर गरिबांच्या दिवाळीचा विचार करून आपल्या परीने त्यांना काही मदत करता येईल का? हा परोपकार विचार करणे महत्वाचे वाटते. शेवटी गोरगरीबाला मदत करून जगण्यात जो आनंद मिळतो त्यापेक्षा दुसरी दिवाळी कुठे साजरी होत नाही. नव्या पिढीच्या तरूणांनी हा विचार करताना प्रत्येकी एकाने यंदाची दिवाळी पाच गरिबांच्या सोबत साजरी केली तर मग परमेश्वरही भांडवलदाराचं भांडवल निश्चित कमी होवु देणार नाही हे तितकंच खरं. आज धनत्रयोदशी अर्थात वसुबारस परवा झाली म्हणजेच दिपावली उत्सवाला प्रारंभ झाला. अभ्यंगस्नान, लक्ष्मीपुजन, भाऊबीज अशा विविधांगी चार-पाच दिवसाचं स्वरूप म्हणजे दिपावली. भारतीय संस्कृती प्रत्येकाचं जीवन तेजोमय करणारी निश्चित त्यातही हिंदु संस्कृतीमध्ये रूढी परंपरा वर्तमान व्यवस्थेला निश्चित मार्गदर्शक करणाऱ्या असतात. प्रत्येक उत्सवाचं स्वरूप वेगवेगळं आहे. दिपावली हा उत्सव एकत्रीत कुटुंब पद्धतीत प्रामुख्याने जास्त आनंद देणारा पुर्वीपासून परंपरा रूढ आहे. अनेकांच्या कुटुंबात आजही भावंडं एकत्रित येतात तर दुसरीकडे अशा उत्सवातही एकमेकांचं तोंड न पहाणारी कुटुंब तथा भावंडं आजही आहेत ते दुर्भाग्य म्हणावे. या निमित्ताने एकत्रित येणं मग बहिणी, जावाई, नातवंडं या साऱ्या गोष्टीचा आनंद आई-वडिलांनाही असतो. दिपावली अर्थात दिवाळं काढणारां सण असंही म्हणायला हरकत नाही. लोक नवे कपडे घेतात. दागदागिने घेतात. अगदी मालमत्ता असो किंवा वाहन खरेदी असो. ज्यांच्याकडे पैसा गरजेनुसार साधन सुविधा घेतात. पण असाही वर्ग समाजात आहे ज्याला केवळ एकवेळ पोटाची काळजी त्याचं काय? असा प्रश्न सामाजिक जाणिव ठेवुन नेहमीच पडतो. खरं म्हणजे जीवनात संवेदना असतील त्यांनाच सामाजिक जाणिव प्रचिती होते. लाखो रूपये जवळ आहेत पण संवेदना नाही, परोपकार भावना नाही किंवा दुसऱ्याला मदत करण्याची किंचितही जाणिव नाही. त्यांच्या आडमाप पैशाला कुणी विचारत नाही तो भाग वेगळा. गरिब हा त्याच्या परीने जीवन जगतो. तो कुणाच्या दारात जात नाही. श्रमावर आधारित त्याची दिवाळी असते. आता बघा, पाच दिवस दिवाळी साजरी करणारे मौजमजा करतील. पण असाही वर्ग पाचही दिवस त्याच्या डोळ्याला दिवाळी दिसत नाही. कारण त्याचं जीवन अंधःकारमय असतं. मग तो भर दिवाळीत ऊसाच्या फडात मजुरी करताना दिसेल तर कुणी आपआपल्या पद्धतीने कामावर दिसतील. कधीकधी गरिबीच्या वेदना एवढ्या भयानक असतात याचा विचार करवत नाही. आपण जेव्हा उत्सव साजरा आनंदात करत असतो किंवा वेगवेगळे पदार्थ बनवुन स्वादिष्ट जेवण करतो त्याचवेळी गरजु आपल्या घरी कुणी भांडी घासायला येतो तर कुणी झाडझुड करायला येतो शेतातले सालगडी बैलकोठा साफ करतात तर आपल्या वाहनावरचा ड्रायव्हर गाडी साफ करायला येतो. अगदी सफाई कामगारापासून हा सारा विषय चिंतेचा कारण मानवाची निर्मिती गरिबी-श्रीमंती अशा स्वरूपाची पहायला मिळते. एका गोष्टीचा विचार भांडवलदारा वर्गांनी नेहमीच केला पाहिजे. पैशाच्या जीवावर चंगळवादात जगताना हा वर्ग भोगवादाच्या आहारी निश्चित गेलेला असतो. त्यावेळी



गरिबांचा विचार न शिवे मनासी. आजही ज्यांच्या घरात पैशाचा धुर निघतो अशा भांडवलदारांना चंगळवादापुढे कुणीच दिसत नाही तो भाग वेगळा. पण ही मंडळी दिवाळी उत्सवात तरी सुखी समाधानी खरंच असतात का? हाही संशोधनाचा विषय. सहज डोळ्यासमोर एक गोष्ट आणुन बघा दिवाळीत शांत झोप कुणाला येवु शकते? उत्तर एकच जो भांडवलदार आहे, ज्याच्याकडे आडमाप पैसा आहे, हा वर्ग शांत झोपु शकत नाही. पण दुसऱ्या बाजुने ज्याला दिवाळी साजरी करण्यासाठी एक रूपाया नाही असा आमचा गरिब शांत प्रकाशमय उजेडातसुद्धा डोळे बंद करून झोपू शकतो. सामाजिक व्यवस्थेमधील हे चित्र कधी कधी विचार निश्चित केला पाहिजे. पण एक गोष्ट आत्मस्वरूपाला विचार करायला लावणारी आहे आणि त्या दृष्टीने बघितलचं पाहिजे. ज्यांच्याकडे चार पैसे साधन सुविधा आहेत किंवा परमेश्वराने ज्यांना भांडवलदाराच्या पंक्तीत बसवलं अशांना पैसा केवळ त्यांच्या जगण्यासाठीच देवानं दिला असं नव्हे. याउलट माझ्याकडे चार पैसे आहेत ते परोपकारासाठी किंवा गोरगरिबांसाठी त्यातला काही सहभाग आपण योगदानाच्या माध्यमातून दिला पाहिजे ही सामाजिक संवेदना ज्यांच्याकडे आहे असे भांडवलदार गोरगरीबांच्या लोकांना सोबत घेवून दिवाळी साजरी निश्चित करत असतील तर मग परमेश्वर त्यांच्या जीवनात कधीही कमी पडू देत नाही.बाहेरचं जावू द्या दिपावली साजरी करताना आपल्या संसारासोबत किमान आपले बंधू, बहिणी, जावाई, नातु, पणतु एवढेच नाही तर सगेसोयरे, भावकी, आप्तस्वकीय यांचा जरी विचार केला तरी खऱ्या अर्थाने दिवाळीचा आनंद घेवू शकतो. मग चार कुटुंब त्यांना कपड्याच्या स्वरूपात मदत असेल, कुठे फराळाच्या स्वरूपात मदत असेल असं कुणी करत नाही असं नव्हे. कारण अनेकजण दिपावली गोरगरिबांच्या सोबत साजरी निश्चित करतात. अगदी जुन्या पिढीतली माणसं आजही स्वतःचा घास एकटे कधीच खात नाहीत. दुसऱ्याचा विचार करूनच जीवन जगतात. पण अलीकडे नव्या पिढीतली तरूणाई चंगळवादाच्या भोगवादाने जास्त जावू लागली. त्यामुळे विशेषतः तरूण मुलांनी दिपावलीसारखा उत्सव गरिबांच्या सोबत साजरा जर केला तर तुमचं भविष्य प्रकाशमय निश्चित होईल. तुमच्या जीवनातला अंधार दुर झाल्याशिवाय रहाणार नाही. चला तर मग आपण एकट्याने दिवाळी साजरी न करण्यापेक्षा गरिबाचा विचार करून साजरी करू शक्य त्या प्रमाणात लोकांना मदत करू या निमित्ताने संकल्प करताना प्रदुषणमुक्त दिवाळी साजरा करणे हा मनाशी ठराव करावा हे नक्कीच. लोका सांगे ज्ञान, आपण कोरडे पाषाण हा लिहिण्याचा उठाठेव केल्यानंतर अनेक माझ्यावरही आक्षेप घेवु शकतात पण योगदान दिल्याचा गवगवा करणाऱ्यांपैकी मी नाही. पण एक निश्चित आदर्श घेण्यासाठी सांगण्याची हिंमत करतो. यंदाची दिवाळी माझ्या परीने साजरी करताना सहा कुटुंबियांना अर्थात गरिबांना सोबत घेवुन साजरी करण्याचा मी प्रयत्न केला आहे. स्वतःला नवं वस्त्र घेण्याअगोदर मी त्या लोकांना आनंद देण्याचा प्रयत्न केला. हाच आदर्श आपआपल्या पातळीवर प्रत्येकाने घेतला तर या उत्सवाचं सादरीकरण मानवतेच्या प्रगतीने झाल्यासारखं निश्चित होईल.

## क्रोध संपुष्टात येण्यासाठी शिक्षण असतं



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपण शिक्षणाचा अर्थ पदवी सोबत जोडतो पण खरया अर्थाने विचार केला तर शिक्षणाचा उदेश खुप विराट आणि विशाल असतो .आपण क्षणिक लाभाकड पाहतो आणि वास्तविक लाभापासून वंचित राहतो.शिक्षण आणि क्रोध एकत्र राहत नाहीत जिथ शिक्षण असतं तिथं क्रोध आपली पाळंमुळं विस्तार करत नाही. क्रोध हा अंहकाराच्या बळावर आपलं साम्राज्य विस्तार करत असतो. मन बुद्धी मध्ये असणारा क्रोध संपुष्टात येऊन सुसंस्कृत व सौजन्यशील होण्यासाठी शिक्षण असत. क्रोध हा जीवनातील विनाशाचा आरंभ आहे आणि याच आरंभाची सुरुवात होऊ नये म्हणून शिक्षणकड पाहणं गरजेचं आहे. शिक्षीत व्यक्ति हा सदैव क्रोध मुक्त असला पाहिजे आणि क्रोध मुक्त असेल तरच तो खरया अर्थाने शिक्षित आहे.**

अन्यथा औपचारिकता म्हणून शिक्षण घेतलं आहे एवढाच माफक त्याचा अर्थ होऊ शकतो.जीवनात शक्ति बळ सामर्थ्य निर्माण होण्यासाठी शिक्षण असणार शिक्षण आपल्याला संयमाच्या मार्गावर सत्याचा शोध घेण्याची मानसिकता निर्माण झाली पाहिजे आणि यासाठी आपलं जीवन समर्पित असल पाहिजे हेच वास्तविक शिक्षण.जीवन अमृत हि भुमिका बजावणार शिक्षण आपल्याला शेवट पर्यंत कळत नाही हेच सध्याच्या युगाच दुर्दैव आहे. आपण शिक्षणाला खुप हलक्यात घेतो याचा अर्थ आपल्याला शिक्षणाचं मुळ अजुन समजलं नाही असच कहिस चित्र आहे.शिक्षण हे वाघीणीचे दुध असुन ते जीवन उत्थानाच सर्वश्रेष्ठ उत्कृष्ट असं माध्यम देखिल आहे. शिक्षणामुळे आपला विवेक जागृत होतो आणि एकद विवेक जागृत झाला कि मग आपण जगातील कोणत्याही शक्तिला ,सामर्थ्याला ,वैभवाला घाबरत नाहीत. त्याच बरोबर आपण पराकोटीचे विनम्र देखिल होतो.कारण संयम आणि शांती जीवनात येऊन क्रोध नष्ट होण्याची प्रक्रिया हि शिक्षण आहे. एकदा जीवनात शांती निर्माण झाली कि मग कोणत्याही प्रकारची भिती उरत नाही सगळं काही स्वच्छ निर्मळ दिसत. संयम हि शक्ती जगातील सगळ्या शक्ति वर प्रभावी ठरते.सत्य असत्य या मधील फरक ओळखता येण त्याच बरोबर सत्य स्वीकारण्याच आणि असत्य नाकारण्याचा धाडस निर्माण होऊन परिपक्वता आरंभ होणं हाच शिक्षणाचा खरा लाभ असतो.पण आपण याच मोठ्या लाभापासून वंचित राहतो मग आपण कसले शिक्षित याचा पण विचार झाला पाहिजे.विवेक जागृत होण्यासाठी शिक्षण हेच मुख्य माध्यम असत.शिक्षणाचं महत्त्व आणि उदेश हा जीवन सार्थकी लागण्यासाठी असतं. शिक्षणामुळे आपली चेतना आपला विवेक जागृत झाला पाहिजे.मुळात आपण शिक्षण कशासाठी घेतोय हा प्रश्न अगदी सहजपणे कोणालाही विचारला तर एकच उत्तर मिळेल आणि हे उत्तर म्हणजे फक्त नौकरी मिळाली पाहिजे अथवा रोजगार संधी किंवा काही तरी पोटापाण्याचा प्रश्न मार्गी लागेल अथवा भौतिक सुख सुविधा साधन संपदा अर्जित होण्यासाठी सहकार्य होईल हाच मुख्य हेतू ठेवून आपण शिक्षण घेत असतो. हेच आपल्याला सगळीकडे ऐकायला मिळेल या मध्ये अजिबात शंका नाही.पण शिक्षण म्हणजे फक्त नौकरी अथवा पोटा पाण्याची सोय हाच समज साध्यतरी सगळीकडे रूढ असला तरी सुद्धा आयुष्यात शिक्षणाचा उपयोग हा मुख्यत्वे चेतना जागृत होण्यासाठी असतो. आपला मेंदू आपली चेतना जागृत झाली तर आपल्यासाठी जगात असंभव असं काहीच उरत नाही .पण आपण खरया अर्थाने याच मुख्य उद्देश पासुन वंचित राहतो .आणि दुय्यम असणार्या उद्देशाला मुख्य समजुन मृग जळात अडकुन राहतो.उदात्त आति उदात्त हेतू धेय्य अर्जित करण्यासाठी असणार शिक्षण आपल्या मध्ये सामर्थ्य ताकद शक्ति निर्माण करत असताना आपला क्रोध समुळ नष्ट करत असतो. पण आपण मात्र शिक्षण म्हणजे फक्त नौकरी एवढाच समज डोक्यात ठेवून वावरत असतो. सामर्थ्य शक्ति आणि ताकद याच महत्त्व जीवनात अनन्यसाधारण असं असतं पण हेच अनन्यसाधारण महत्त्व आपल्याला आपल्या मध्ये निर्माण करण्यासाठी शिक्षणाची खरी आवश्यकता आणि भुमिका समजणं गरजेच आहे.आपण हि भुमिका जाणुन घेण्यासाठी फार उत्सुक नसतो.नौकरी अथवा रोजगार कसा मिळेल आणि मार्क कसे मिळतील वाढतील एवढ्यापुरताच आपण शिक्षणासोबत जोडले जातो .आपण फक्त क्षणिक लाभ पाहते नौकरी एवढाच आपला वरकरणी उदेश असल्याने आपण शिक्षणातील अनमोल अमृता पासुन वंचित राहतो.कस्तुरी पोटात घेऊन फिराणारा मृग कस्तुरी पासुन वंचित राहतो.तशीच आपली सुद्धा काहिशी अवस्था आहे. शिक्षणाकडे पाहण्याचा योग्य दृष्टिकोन आपल्याला योग्य वेळी समजला तर आपलं जीवन क्रोध मुक्त होण्यासाठी असतो. आपण शिक्षणाकडे ज्या पद्धतीने पाहतोय त्याच पद्धतीने त्याचा लाभ तशाच पद्धतीने आपल्याला होईल. शिक्षणाच्या प्रति आपण जेव्हा उदात्त आणि विराट दृष्टीकोन ठेवून ज्ञान अर्जित करू तेव्हा निश्चितच आपला विवेक जागृत होऊन आपल्या जीवनात संयमाचा शांतीचा संचार होईल आणि मगच शिक्षणाचा खर लाभ आपल्याला होऊन तेच ज्ञान लोक कल्याणासाठी करणी लागेल या मध्ये काही शंका नाही.जीवनाचं यथार्थ ज्ञान समजण्यासाठी शिक्षणाचा मुल्य आणि महत्व समजण्या बरोबरच शिक्षणाचा मुख्य हेतू आपल्याला आपल्या जीवनात साध्य करता आला पाहिजे.व त्याचा योग्य उपयोग करून घेऊन आपलं जीवन सार्थक करण्या बरोबरच आपण आपलं शिक्षण ज्ञान हे समाजाच्या देशाच्या हितासाठी सत्कारणी लगल पाहिजे.शिक्षण सत्कारणी लागण हे खुप महत्वाच आणि आवश्यक बाब असुन ते गरजेचे आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# फुलंब्रीत हजरत टिपु सुलतान जयंती उत्सव कमिटीची कार्यकारिणी घोषित

आधुनिक केसरी न्यूज



**फुलंब्री :** शेर-ए-हिन्द तथा स्वंतत्र सेनानी हजरत टिपु सुलतान रह.यांची 20 नोव्हेंबर रोजी येणाऱ्या जयंती निमित्त शहरात जयंती उत्सव कमिटी ची कार्यकारणी घोषित करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात रविवारी झालेल्या एका बैठकीत जयंती निमित्त शहर व तालुक्यात विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यात 20 नोव्हेंबर रोजी निबंध स्पर्धा, शहर व तालुक्यात ग्रामीण रुग्णालय आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांवर रुग्णांना फळ वाटप करण्यात येणार आहे तसेच 25 नोव्हेंबर रोजी सकाळी विद्यार्थींना बक्षीस वितरण तर संध्याकाळी स्वतंत्र सेनानी हजरत टिपु सुलतान यांच्या जीवनावर आधारित व्याख्यान चे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे व 26 नोव्हेंबर रोजी सकाळी 11 ते 3 वाजेपर्यंत भव्य रक्तदान शिबीर ठेवण्यात आले आहे तर संध्याकाळी भव्य मिरवणूकीचे आयोजन करण्यात आले असून यंदा तिन दिवस मोठ्या उत्साहाने स्वतंत्र सेनानी हजरत टिपु सुलतान यांची जयंती साजरा करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला आहे. तसेच सदर बैठकीत स्वतंत्र सेनानी हजरत टिपु सुलतान रह. जयंती उत्सव कमिटी च्या अध्यक्षपदी फरहान शहा, तर कार्याध्यक्ष पदी अजय गंगावणे, उपाध्यक्ष पदी जमाल शेख, गणेश सुरभय्ये, सचिव पदी जावेद खान, सहसचिव पदी शाहरुख पठाण, कोषाध्यक्षपदी इरफान सय्यद, सहकोषाध्यक्ष पदी शेर खान, सरचिटणीस पदी जाकेर पटेल, सहसरचिटणीस पदी आवेज शहा, प्रसिद्धी प्रमुख पदी जाकेर आतार, सरफराज पटेल यांची निवड करण्यात आली.

या वेळी कमिटीचे सर्व पदाधिकारी सह मार्गदर्शक ज्येष्ठ समाज सेवक नफीस पटेल, पत्रकार इमरान खान, पत्रकार इस्माइल खान, शिवसेना उपतालुका प्रमुख अय्युब पटेल, कृऊबा संचालक अजहर सय्यद, उद्योजक फेरोज पठाण, मोबीन पाशा, रिपाइंचे भगवान गंगावणे, पत्रकार अकबर शहा, अनसार पटेल, मोबीन पटेल, रईस पटेल, हाफीज मन्सुरी, एजाज चिस्ती, अरबाज कुरैशी इमरान सय्यद, सलमान शेख, हारुण शेख, मुस्तुफा पटेल, नुर पटेल, मोसीन खान, नसिर पटेल, सलमान पटेल, लुकमान पटेल, बबलु शेख सह अन्य नागरीकांची उपस्थिती होती.




# मीनल कुलकर्णी-अवचट यांचा न्यूयॉर्क येथे सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** शहरातील रहिवाशी असणाऱ्या मिनल कुलकर्णी-अवचट यांचा न्युयॉर्क येथे पुरस्काराने सन्मान करण्यात आला आहे. मिनल कुलकर्णी- अवचट यांना न्यूयॉर्क येथे व्यावसायिक वाढ, महिला (सक्षमीकरण, हार्टफोर्ड समुदाय प्रमुख निर्णय सहभाग आणि उत्कृष्ट योगदानासाठी २०२३ महिला प्रेरणा पुरस्काराने गौरव करण्यात आले आहे. मिनल कुलकर्णी - अवचट यांनी एमएस्सी जळगाव, एमबीए पुणे विद्यापीठ येथे शिक्षण पूर्ण करून इन्फोसिस, युएसए येथे स्वकर्तृत्वावर नोकरी मिळवली. युएसए मधील महिलांच्या उल्लेखनीय कामगीरी बद्दल पुरस्कर देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले . विदेशात खान्देशचा गौरव वाढविण्याचे काम मिनल यांनी केले. नामांकनासाठी व दिलेल्या संधीसाठी मिनल यांनी डीएफएस हार्टफोर्ड.सीटीयांचे आभार मानले.

# पुण्यातल्या फ्लॅटमध्ये आढळले पती-पत्नीचे मृतदेह

आधुनिक केसरी न्यूज

**पुणे :** पुण्यातल्या बंद फ्लॅटमध्ये तरुण जोडप्याचे मृतदेह आढळून आले आहेत. पुण्यातल्या लोहगाव भागात ही घटना घडली आहे. २३ वर्षांचा तरुण आणि त्याची २१ वर्षांची पत्नी असे दोघेजण लोहगाव येथील इमारतीत भाडे तत्त्वावर राहात असलेल्या त्यांच्या फ्लॅटमध्ये मृतावस्थेत आढळले आहेत. त्यांचे मृतदेह सडण्यास सुरुवात झाली होती. डबल बेडवर हात बांधलेल्या अवस्थेत दोघांचे मृतदेह आढळले आहेत. या प्रकरणी विमानतळ पोलिसांनी चौकशी सुरु केली आहे.

विमानतळ पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार किरण महादेव बोबडे (वय -२३) आणि आरती महादेव बोबडे (वय-२१) या दोघांचे मृतदेह त्यांच्याच घरात आढळले आहेत. किरण बोबडे पोस्टात कंत्राटी तत्त्वावर काम करत होता. तर आरती एका खासगी बँकेत काम करत होती.

स्थानिकांकडून पोलीस कंट्रोल रुमला फोन आला. त्यात सोसायटीच्या एका फ्लॅटमधून दुर्गंधी येत असल्याचे सांगितले. यानंतर ११ वाजण्याच्या सुमारास लोहगाव या ठिकाणी ज्या इमारतीतल्या फ्लॅटमधून दुर्गंधी येत होती तिथे पोलीस पोहचले. या दोघांनी दोन-तीन दिवसांपासून घराचा दरवाजा उघडला नाही. आता त्यांच्या घरातून दुर्गंधी येते आहे, असे सोसायटीतल्या लोकांनी सांगितलं. ज्यानंतर पोलिसांनी दरवाजा तोडला. दरवाजा तोडून पोलीस आतमध्ये गेले तेव्हा त्यांना किरण आणि आरती या दोघांचे मृतदेह आढळून आले. आम्ही जेव्हा त्या दोघांचे मृतदेह पाहिले तेव्हा ते हात बांधलेल्या अवस्थेत होते आणि दोघांचेही मृतदेह सडू लागले होते, असे विमानतळ पोलीस ठाण्यात काम करणाऱ्या एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले. इंडियन एक्स्प्रेसने याविषयीचं वृत्त दिलं आहे. पोलिसांच्या म्हणणे आहे की प्राथमिक अंदाजानुसार हे प्रकरण कसलं आहे हे सांगणे थोडे कठीण आहे. कारण घरात सक्तीने कुणीही घुसल्याच्या खुणा नाहीत. सगळे दरावाजे आणि खिडक्या आतून बंद होत्या. दोघांचे हात समोरच्या बाजूला बांधण्यात आले होते. या दोघांचे मृतदेह आम्ही शवविच्छेदनासाठी पाठवले आहेत. त्याचा अहवाल आल्यानंतर मृत्यूचे कारण कळू शकणार आहे.




महाराष्ट्र Business Katta













# विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या : चिंतनाचा विषय

आधुनिक केसरी

**आपल्या पिढीने खऱ्या अर्थाने बालपण जगले आहे. मित्रांबरोबर भर उन्हात अनवाणी शेतांमध्ये फिरायचं..बोरं पाडायची खायची.. खिशात भरायची.चिंचेच्या झाडाच्या चिंचा पाडून खायच्या तर झाडावर चढून डाबदुबली खेळायची, झाडाच्या या फांदीवरून त्या फांदीवर जायचं, फांदीला लटकायचं आणि तशीच कुठलाही विचार न करता खाली उडी मारायची असं बालपण आपण जगलो. ना कुणी शोधायला यायचं ना घरचे फारशी काळजी करायचे.आज मोबाईल युग असल्याने 10 मिनिटे मुलांना शाळेतून यायला उशीर होताच आताच्या पालकांचा जीव भांड्यात पडतो व मुलांचा शोध सुरू होतो.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

सध्याचे युग हे स्पर्धेच युग असल्याने आताची मुलं ह्या निखळ आनंदाला मुकली आहेत. स्पर्धेच्या युगात पालकांनी त्यांचा पुरता रोबोट करून टाकला आहे.तू जेईई च झाला पाहिजे,तू नीट उत्तम गुणांनी उत्तीर्ण होत डॉक्टरच झाला पाहिजे असे अपेक्षांचे ओझे पालक आपल्या मुलांच्या खांद्यावर टाकत आहेत.

मुलं जन्माला येण्यापूर्वी त्याने काय व्हावं हे ठरवणारी पालकांची आजची पिढी त्यांना यंत्रमानव बनवत आहेत. आपला मुलगा प्रथमतः माणूस झाला पाहिजे. या समाजात तो माणूस म्हणून कसा जगेल असा दृष्टीकोन बाळगणारी पालक मंडळी आता दिसेनाशी झाली आहे. मुलांच्या भवितव्याच्या सतत चिंतेत असणाऱ्या पालकांनी स्वतःचा संसार डिस्टर्ब करत बायको मुलांसोबत तर पतीराज घरी हाताने स्वयंपाक बनवत तर कुठे मेस, हॉटेल मध्ये जेवायला जात स्वतःची अबाळ करून घेत मुलांच्या खांद्यावर आपल्या स्वतःच्या अपेक्षांचे ओझे टाकताना दिसत आहेत.हे सगळं करणं अजिबात चुकीचे नाही.मात्र आपला पाल्य त्या कुवतीचा आहे का..? त्याची नेमकी आवड कशात आहे हे बघण्याचा पडताळण्याचा त्रास ते घेत नाहीत.

नीट साठी एव्हडी धडपड करण्यापेक्षा त्याने जे करायचे ते 'नीट' करावे. असे असणे गरजेचे असतांना मुलांना दाबून, दरडावून आपल्या अपेक्षांचे ओझे त्यांच्या खांद्यावर टाकल्या जात आहे.

मुलं जन्माला येण्यापूर्वी त्याने काय व्हावं हे ठरवणारी पालकांची आजची पिढी त्यांना यंत्रमानव बनवत आहेत.

आपला मुलगा प्रथमतः माणूस झाला पाहिजे. या समाजात तो माणूस म्हणून कसा जगेल असा दृष्टीकोन बाळगणारी पालक मंडळी आता दिसेनाशी झाली आहे.

मुलांच्या भवितव्याच्या सतत चिंतेत असणाऱ्या पालकांनी स्वतःचा संसार डिस्टरब करत बायको मुलांसोबत तर पतीराज घरी हाताने स्वयंपाक बनवत तर कुठे मेस, हॉटेल मध्ये जेवायला जात मुलांच्या खांद्यावर आपल्या स्वतःच्या अपेक्षांचे ओझे टाकताना दिसत आहेत.हे सगळं करणं अजिबात चुकीचे नाही.मात्र आपला पाल्य त्या कुवतीचा आहे का..? त्याची नेमकी आवड कशात आहे हे बघण्याचा पडताळण्याचा त्रास ते घेत नाहीत.

नीट साठी एव्हडी धडपड करण्यापेक्षा त्याने जे करायचे ते 'नीट' करावे. असे असणे गरजेचे असतांना मुलांना दाबून, दरडावून आपल्या अपेक्षांचे ओझे त्यांच्या खांद्यावर टाकल्या जात आहे.

पालकांच्या अपेक्षांना आपण खरे उतरू शकत नसल्याने विद्यार्थी आत्महत्येसारखा चुकीचा मार्ग निवडत आहेत. या अनुषंगाने सीएनआरबी अर्थात नॅशनल क्राईम रेकॉर्डस् ब्युरो ने दिलेली आकडेवारी धक्कादायक आहे.

सन २०१६ मध्ये ९४७८ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे.२०१७ मध्ये ९९०५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली.

हाच आकडा २०१८ मध्ये १०१५९ वर जाऊन पोहचला.आपल्या राज्यात दरवर्षी १४०० विद्यार्थी आत्महत्या करतात.



आत्महत्या करणाऱ्या देशातील ७ विद्यार्थ्यांमागे महाराष्ट्रातील एक विद्यार्थी असे याचे प्रमाण आहे.

२०११ च्या तुलनेत आत्महत्येच्या प्रमाणात तब्बल ७० टक्क्यांनी वाढ झाली असल्याचे एन. सी. आर. बी. चा रिपोर्ट सांगतो.

२०२१ मध्ये १,६४०३३ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केली आहे.२०२० च्या तुलनेत ही ७.२टक्याने ही वाढ झाली आहे.

दिवाळी पूर्वी प्रत्येक शाळा प्रथम सत्रांत परीक्षा घेत असते.यावेळी मराठीच्या इयत्ता ९ वी च्या प्रश्न पत्रिकेत अपठीत गद्य उतारा देण्यात आला आहे.

त्यात कोटा सारख्या एकट्या शहरात विद्यार्थ्यांच्या झालेल्या आत्महत्यांचा उहापोह करण्यात आलेला आहे.

स्पर्धा परीक्षेच्या बाबतीत देखील असाच प्रकार आहे. यूपीएससी च्या देशात ८००ते ९०० जागा भरल्या जात असतांना त्यासाठी १० लाख विद्यार्थी परीक्षेला बसतात तर एमपीएससी च्या २००-३०० जागेला ३ ते ४ लाख विद्यार्थी सामोरे जातात.

स्पर्धा आणि पालकांच्या अपेक्षा प्रचंड वाढलेल्या असल्याने मुलं अपयश पचवू शकत नाहीत आणि परिणामी ते आत्महत्या सारखा चुकीचा मार्ग निवडतात.

औद्योगिक दृष्ट्या एकेकाळी नावाजलेलं कोटा शहर आज एज्युकेशनल हब झाले आहे. तर याच कोटा शहरात दरवर्षी विद्यार्थ्यांच्या होत असलेल्या आत्महत्या चिंतेचा विषय बनले आहे. कुठल्याही कोचिंग क्लास चे सक्सेसचे प्रमाण केवळ १ ते २ टक्के आहे. मात्र स्वतःच्या बळावर किंवा इतर क्लास मधून यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांच्या फोटोचा वापर करत जाहिराती वर जोर देणारे क्लास आज आर्थिकदृष्ट्या गलेलठ्ठ झाले आहे. क्लासेस हा पैसा कमविण्याचा सरळ सोपा मार्ग झाला असून तेलघाण्याच्या बैला सारखे मुलांच्या खांद्यावर अपेक्षांचे जू टाकल्या गेलेले आहे. तालुक्याच्या ठिकाणी दर आठ दिवसाला एका डॉक्टरच्या हॉस्पिटलचा शुभारंभ होतो आहे. जागोजागी दवाखाने थाटल्या गेलेले आहे. अपवाद वगळता नवीन डॉक्टर मंडळींना आपले हॉस्पिटल चे भाडे, कर्मचारी यांचे पगार यासाठीचे पैसे जमवतांना नाकी नऊ येत आहेत. तर वैद्यकीय शिक्षणावर करोडो रुपये खर्च झालेले असणे,हॉस्पिटल उभे करण्यासाठी लागणारा खर्च ह्यामुळे डॉक्टर मंडळी कसाया सारखा सुरा हातात घेऊनच तयार आहेत. केवळ डॉक्टर इंजिनिअर पेक्षा अनेक क्षेत्रात, व्यवसायात मुलांना करिअर करण्यासाठी अनेक क्षेत्र असतांना त्यांना त्यांच्या इच्छेनुसार व आवडीनुसार गगनभरारी घेऊ देणे महत्वाचे आहे, असे असतांना त्यांना आत्महत्येची वाट पालक स्वतःच दाखवत आहेत असे म्हटल्यास ते चुकीचे होणार नाही.

आजच्या मुलांची स्पर्धेच्या आणि अपेक्षांच्या ओझ्यामुळे अशी अवस्था अशी झाली आहे की...

**थक गई मेरी जिंदगी भी**
**लोगों को जवाब देते-देते**
**अब कहीं मेरी मौत ना..**
**लोगों का सवाल बन जाये ..**



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

# दहशतवादाच्या व्याख्येबाबत जगाचे एकमत आवश्यक!

आधुनिक केसरी

**अलीकडे इस्लायवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर परत एकदा दहशतवादाच्या परिभाषेबाबत चर्चा होवू लागली आहे. दहशतवादाच्या परिभाषेबाबत अजूनही एक वाक्यता नाही. काही देशांना दहशतवादी हे क्रांतिकारी वाटतात तर काहींना ते स्वतंत्रता सेनानी वाटतात. अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या संघटनांना काही देश क्रांतिकारी समजतात. पण ज्यांच्या विरोधात लढा दिला जातो त्यांना हेच क्रांतिकारी दहशतवादी वाटतात.आपले हक्क व अधिकारासाठी लढणाऱ्या ज्या संघटना आहेत या संघटना हिंसक मार्गाचा अवलंब करतात.**

घातपात, बॉम्बस्फोट घडवून आणतात आणि सामान्यांना लक्ष करतात. अशा हिंसक कारवाया करणाऱ्या संघटनांना दहशतवादी म्हटल्या जाते.पण याबाबत अजूनही एकवाक्यता नाही. अनेक राष्ट्रं दहशतवादापुढे हतबल होताना दिसत आहेत. सीमापार दहशतवादाच्या समस्येनं राष्ट्रांची डोकेदुखी अधिकच वाढली आहे. असं असूनही याविरोधी जागतिक लढा उभा राहू शकलेला नाही. कारण दहशतवादाची व्याख्या अद्याप होऊ शकलेली नाही. आजघडीला दहशतवादाच्या २१६ व्याख्या आहेत.

प्रत्येक राष्ट्र आपल्या हितसंबंधानुसार याचा अर्थ लावतं. तसंच सीमापार दहशतवादाचे पुरावे देणे किंवा तो सिद्ध करणं अवघड असल्यामुळे आणि दहशतवादाला प्रोत्साहन देणाऱ्या राष्ट्रांविरुद्ध दंडात्मक कारवाई करण्यासंबंधीची कोणतीही तरतूद आंतरराष्ट्रीय कायद्यात किंवा संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या घटनेत नसल्यामुळे अनेक राष्ट्रं आपल्या शत्रूराष्ट्रांना अडचणीत आणण्यासाठी दहशतवादाच्या साधनाचा सर्रास वापर करत आहेत. पाकिस्तान याचं उत्तम उदाहरण आाहे.भारत १९९० च्या दशकांपासून सीमापार दहशतवादाने त्रस्त व ग्रस्त आहे.पाकिस्ताननं गेल्या दोन दशकांपासून भारतात सुरू केलेल्या या छुप्या युद्धामुळे एक लाखांहून अधिक निष्पाप लोकांना आपला प्राण गमवावा लागला आहे. त्यामुळे पाकिस्तान जोपर्यंत भारतातील दहशतवादी हिंसाचाराला मदत करणं थांबवत नाही, सीमेपलीकडून होणारा गोळीबार थांबवत नाही, तोपर्यंत पाकिस्तानबरोबर कोणत्याही प्रकारची चर्चा करायची नाही, अशी भूमिका भारतानं घेतली आहे. २००९मध्ये, आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयावरील रोम कॉन्फरन्सने या वस्तुस्थितीवर शोक व्यक्त केला की "दहशतवाद आणि ड्रग्सच्या गुन्ह्यांची कोणतीही सामान्यतः स्वीकृत व्याख्या नाही जी न्यायालयाच्या अधिकारक्षेत्रात समाविष्ट केली जाऊ शकते". या समान व्याख्येच्या अभावामुळे, वेगवेगळ्या देशांना त्यांच्या स्वतःच्या अटींनुसार दहशतवादाची व्याख्या करावी लागली, ज्यामुळे दहशतवादाचे वेगवेगळे अर्थ काढले गेले. असे असूनही, आंतरराष्ट्रीय समुदायाने व्यापकपणे दहशतवादाची व्याख्या अशी केली आहे जी व्यक्ती किंवा सरकारांवर दबाव आणण्यासाठी धमक्या किंवा हिंसाचाराचा वापर करते आणि ज्यामुळे मृत्यू, गंभीर दुखापत किंवा तुरुंगवास होतो. आंतरराष्ट्रीय स्तरावर जवळपास १६ करार दहशतवादाच्या मुद्द्याशी संबंधित आहेत. परंतु अनेक चर्चा, वादविवाद आणि विचारविमर्शानंतरही आंतरराष्ट्रीय समुदाय दहशतवादाच्या समान व्याख्येवर सहमत होऊ शकलेला नाही. १९९६ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेच्या ४९ व्या सत्रादरम्यान, भारताने दहशतवादाचा सामना करण्यासाठी सर्वसमावेशक आंतरराष्ट्रीय कायदा प्रस्तावित केला. युनायटेड नेशन्सला लिहिलेल्या पत्रात असे नमूद केले आहे की सर्व दहशतवादाशी संबंधित नियमांना एकत्र आणणारा आणि कायदेशीर बंधनकारक असलेल्या सर्वसमावेशक कायद्याची तीव्र गरज आहे. दहशतवादी अनेकदा एका देशात आपल्या कारवाया करतात आणि नंतर दुसऱ्या देशात आश्रय घेतात, असे सांगण्यात आले. भारताने सर्व प्रकारच्या दहशवादाचा विरोध केलेला आहे. इस्त्रायलवर हमास केलेल्या हल्ल्याला भारताने दहशतवादी हल्ला म्हंटले आहे. एवढेच नव्हे तर जेव्हा संयुक्त राष्ट्रात इस्त्रायल विरोधात ठराव आला तेव्हा भारताने तटस्थता बाळगली.

इस्त्राईल हमास युद्धात आतापर्यंत दहा हजारा लोकांचा बळी गेला. युद्ध शबविण्यासाठी आमचा व्यक्त ठरावा आला असता ठरावच्या बाजूने १२० देशांनी कॉल दिला तर इस्त्रायल अमेरिकेसह १४देशांनी ठरावा विरोधात मतदान केले. घरचा पट्टीत मानवतावादी युद्धविरामाची मागणी करणाऱ्या संयुक्त राष्ट्र संघाच्या ठरावावर भारताने तटस्थ भूमिका घेत आपल्या तटस्थ धरणाचे समर्थन केले विशेष म्हणजे या ठरावात हमास या दहशतवादी संघटनेने इस्लावर केलेल्या दहशतवादी हल्ल्याचा उल्लेख करण्यात आला नव्हता केवळ फाटण्यास नव्हे तर अमेरिका कॅनडा, ऑस्ट्रेलिया जर्मनी जपान या प्रगत देशांनीही स्वतःला या ठरापासून दूर ठेवले. याचाच अर्थ हा की दहशतवादाच्या परिभाषेबाबत अजूनही देशांमध्ये एकवाक्यता नाही. अलीकडे इस्रायलवर झालेल्या धक्कादायक दहशतवादी हल्ल्याचे परिणाम आता उलगडून लागले आहेत. हा हल्ला हराकाह अल-मुकावामाह अल-इस्लामिया किंवा हमास ने केला आहे. जो एक इस्लामी मिलिशिया चळवळ आणि पॅलेस्टिनी कारणाभोवती पसरलेल्या अनेक देशांमध्ये प्रतिबंधित दहशतवादी गट आहे. हमासला अमेरिका, इस्त्रायल भारता दहशतवादी गट म्हणून संबोधतात.मात्र अनेक मुस्लिम देश इराण, लेबनान सीरिया आदी देश हमासला दहशतवादी मानायला तयार नाही.

आज दहशतवाद राष्ट्रीय पातळीपुरता मर्यादित उरलेला नाही. राष्ट्रीय पातळीवरच्या दहशतवादी संघटनांनी आपली बांधिलकी मोठ्या आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनांशी व्यक्त केलेली असल्याने, आता त्यांना मोठे पाठबळ मिळाले आहे. त्यामुळेच या दहशतवादाचा सामना करणे, हे एका राष्ट्रापुरते मर्यादित राहिलेले नाही. ग्लोबल टेररिझम इंडेक्स २०२३ नुसार २०२२ मध्ये दहशतवादी प्राणघातक हल्ले झाले. २०२१ मध्ये प्रति हल्ल्यात १.३ च्या तुलनेत २०२२मध्ये सरासरी १.७ लोक मारले गेले आहेत. बऱ्याचदा हिंसक संघर्षामुळे दहशतवादाला चालना मिळताना दिसते. २०२२ मध्ये ८८ टक्के हल्ले आणि ९८ टक्के दहशतवादी मृत्यू संघर्षग्रस्त देशांमध्ये घडले आहेत.संयुक्त राष्ट्राने ठराव २६१७ पास केला ज्याने पुष्टी केली की दहशतवाद त्याच्या सर्व प्रकटीकरणांमध्ये आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेसाठी सर्वात गंभीर धोक्यांपैकी एक आहे. दहशतवादाची कोणतीही कृत्ये गुन्हेगारी आणि अन्यायकारक आहेत.मात्र याबाबत अजून देशांमध्ये एकवाक्यता नाही.

# अर्धे शैक्षणिक वर्ष संपूनही विद्यार्थ्यांना अजून गणवेशच नाही

## नाव मोठं अन् लक्षण खोटं : धाराशिव येथील भोसले हायस्कूलची अशीच अवस्था

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन कोरडे**

**धाराशिव :** जिल्ह्यातील नावाजलेले असे भोसले हायस्कूल त्या मध्ये हजारोंच्या वर विद्यार्थी शिक्षण घेतात. शैक्षणिक वर्ष सुरू होऊन पाच महिने उलटले, आज बहुतांश वर्गातील विद्यार्थ्यांच्या सहामाही परीक्षा संपल्या तरीही शाळांमधील अनेक विद्यार्थ्यांना अद्यापही गणवेश मिळाले नाहीत. शहरातील नामांकित भोसले हायस्कूल साठी ही अतिशय निंदनीय बाब आहे. काही महिन्यापूर्वीच धाराशिव शहरामध्ये शिक्षणाची ज्ञानगंगा उभा करणाऱ्या आदरणीय शिक्षण महर्षी के.टी.पाटील यांचा पूर्णाकृती पुतळा उभा करण्यासाठी करोडो खर्च करणाऱ्या या हायस्कूलला विद्यार्थ्यांसाठी गणवेश उपलब्ध करून देण्यात सारस्व वाटत नाही.

आश्चर्याची बाब म्हणजे या गणवेशासाठी विद्यार्थ्यांचे पालक पैसे घेऊन हजर आहेत मात्र विद्यार्थ्यांच्या मापाचे गणवेश उपलब्ध नसल्याचे कारण देत या हायस्कूल कडून वेळ मारून नेण्याचे



काम केले जात आहे. धाराशिव शहराच्या एकाही कपड्यांच्या दुकानात भोसले हायस्कूलमधील किंवा नूतन शाळेतील विद्यार्थ्यांसाठी लागणारे गणवेश धाराशिव शहरातील छोट्या किंवा मोठ्या कुठल्याही कपड्याच्या दालनामध्ये मिळत नाही.

यामुळे पालक वर्गामधुन नाराजीचा सूर आहे.

भोसले हायस्कूलची महती सांगताना शिक्षण महर्षी के.टी.पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळा अनावरण दिवशी लाखोच्या संख्येने आजी-माजी जमलेले विद्यार्थी त्यासोबतच भाजपची प्रतिष्ठित मंडळी हजर होती. त्याच कार्यक्रमात अनेक शालेय विद्यार्थी विना गणवेश हजर होते.याकडे मात्र शालेय प्रशासनाचा जाणीवपूर्वक कानाडोळा होता. आज घडीला सुद्धा शैक्षणिक अर्धे वर्ष उलटले तरीही भोसले हायस्कूल मधील वरिष्ठ विभागाकडून विद्यार्थ्यांच्या गणवेश बाबत विचारणा केली असता सध्या मापाचे ड्रेस शिल्लक नाहीत लवकरच मागवले जातील असे सांगून वेळ मारून नेण्याचे काम केले जात आहे. हे असे चित्र जर वर्षभर राहिले तर विद्यार्थ्यांनी शाळेतून शिस्तीचे काय धडे घ्यावेत याबाबतही पालकांना मुलांच्या भविष्याची चिंता वाटत आहे.

# शेतकऱ्यांना पीकविम्याची अग्रीम रक्कम त्वरित द्या !

## अन्यथा चक्का जाम : भूमिपुत्र शेतकरी संघटना

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत खडसे**

**वाशिम :** यंदाच्या पावसाळ्यात सुरवातीपासूनच जिल्ह्यात अत्यल्प पाऊस पडला आहे. तद्वतच पावसाअभावी खरीपाच्या पेरण्या सुद्धा उशिरा झाल्या आहेत. जेमतेम पावसावर पीक उगवल्या नंतर पावसाने सलग २० ते २५ दिवस ओढ दिल्यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. परिणामी जिल्ह्यातील शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. अशा बिकट परिस्थितीत शेतकऱ्यांना आर्थिक आधाराचा हातभार लावण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांचा पिकविमा मंजुर करून, पिकविम्याची २५ टक्के अग्रीम रक्कम शेतकऱ्यांना देण्याचे निर्देश दिले आहेत. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी यांनी मंजूरात सुद्धा दिली आहे. तथापि सदर अग्रीम रक्कम विमा कंपनी देण्यास तयार नाही. याबाबत भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी विमा कंपनीचे जिल्हा व्यवस्थापक सोमेश देशमुख व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाहा यांची भेट घेऊन यावर तोडगा काढण्याची मागणी केली असता, सदर कंपनीकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे. मात्र, सदर रक्कम दिवाळी पुर्वी न दिल्यास संघटनेकडून दिवाळी नंतर संपूर्ण जिल्ह्यात चक्का जाम आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. अशी माहिती भूमिपुत्र शेतकरी संघटनेच्या सूत्रांनी दिली आहे.

जिल्ह्यातील शेतकऱ्यांना पिकविम्याची अग्रीम रक्कम जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेली असतांनाही विमा कंपनी मात्र शेतकऱ्यांना २५ टक्के अग्रीम रक्कम देण्यास तयार नाही. त्यामुळे भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुपंत भुतेकर यांनी कंपनीच्या जिल्हा व्यवस्थापक सोमेश देशमुख व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी आरिफ शाहा यांची भेट घेऊन यावर तोडगा काढण्याची मागणी केली. यावेळी कंपनीकडून सकारात्मक उत्तर देण्यात आलं असून येत्या दोन दिवसात या संदर्भात निर्णय घेतला जाईल अशी माहिती देण्यात आली. कंपनीने दिवाळी पुर्वी निर्णय न घेतल्यास दिवाळी नंतर भूमिपुत्र शेतकरी संघटनेकडून जिल्ह्यात चक्का जाम आंदोलन केले जाणार आसल्याचे विष्णुपंत भुतेकर यांनी सांगीतले. यावेळी रिसोड बाजार समितीचे सभापती संजय शिंदे, ॲड संतोष पोफळे, बबनराव सानप, रविंद्र चोपडे, सचिन काकडे, भगवान गाडे, भिमराव शेजुळ तथा भूमिपुत्र शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.



# वन्यजीव संशोधकांनी शोधली रंगीत पाल

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भारतातील वन्यजीव संशोधकांना नुकत्याच एका रंगीत पालीचा शोध लावण्यात यश आले आहे. तामीळनाडूतील वीरीधूनगर जिल्ह्यातील राजपलायाम मधील उंच डोंगररांगांमधील घनदाट जंगलात ही पाल त्यांना आढळून आली.

पालींच्या विविध जातींचा अभ्यास करण्यासाठी अमित सैय्यद आणि त्यांच्या चमूतील दोन सहकारी तामिळनाडूच्या घनदाट जंगलात अनेक वर्ष शोध घेत होते. साधारणपणे समुद्र सपाटीपासून १२४५ मीटर उंच असणाऱ्या या डोंगर भागातील घनदाट जंगलात २०१३ पासून संशोधनाचे काम चालू होते. या जंगलात अनेक लहानमोठे हिंस्त्र प्राणी आहेत. येथे राहण्याची, जेवणाची, पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था नाही. त्यामुळे झाडाखाली राहात जेवढे सामान सोबत नेले, तेवढ्यावरच संशोधकांनी गुजराण केली.

२०१५ ला अमित सैय्यद व त्यांच्या चमुला यश आले आणि ही पाल सापडली. त्यानंतर या पालीवर प्रयोगशाळेत संशोधन करून त्याच्या सर्व अवयवांचा, त्याच्यावर असणाऱ्या खवल्यांचा व जनुकीय अभ्यास अमितने सुरू केला. शास्त्रीय अभ्यासातून नक्की झाले की ही पाल नवीन असुन वन्यजीवशास्त्रात याची अजूनही नोंद नाही. अमित सैय्यद यांनी या पालीला आपल्या वडिलांचे नाव द्यायचे ठरवले. प्रो. रशीद सैय्यद हे अमितचे वडील असून 'निमास्पिस रशिदी' असे या पालीचे नाव ठेवण्यात आले.

# राजीव गांधी क्रीडांगण सुधारणा करण्यासाठी शिवसेनेचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**पालघर :** पालघर जिल्यातील गांधी क्रीडांगण हे जव्हार तालुक्यातील एकमेव मोठे क्रीडांगण असून ९ ऑगस्ट २०२३ रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस व अजित पवार हे जव्हार येथे जागतिक आदिवासी दिनाच्या कार्यक्रमाला उपस्थित राहणार असल्याने, आदिवासी विकास विभागाने सदर कार्यक्रमाचे आयोजन राजीव गांधी क्रीडांगणात केले होते. त्यासाठी करोडो रुपये खर्च करून या क्रीडांगणामध्ये दगडाची भर करून, त्यामध्ये खोदकाम करुन तसेच क्रीडांगणात रस्ता तयार करून पुरती वाट लावली होती. सदर क्रीडांगण हे जव्हार, मोखाडा, विक्रमगड, वाडा या तालुक्यातील एकमेव मोठे क्रीडांगण आहे. सन १९९९ साली जव्हार नगर परिषदेमार्फत हे क्रीडांगण बांधण्यात आले होते. या क्रीडांगणावर ग्रामीण व शहरी भागातील खेळाडूंकरता क्रीडा स्पर्धा तसेच आदिवासी विकास विभागाच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा होत असतात. सदर क्रीडांगणाचा उपयोग गावातील अबाल वृद्ध, लहान मुलं , महिला यांना मॉर्निंग वॉक तसेच तरुणांना कबड्डी, खो-खो, क्रिकेट खेळण्यासाठी होत असतो. असे असताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यक्रमासाठी या क्रीडांगणाची अक्षरशा दुरवस्था करण्यात आली. हे क्रीडांगण पूर्ववत सुधारणा करून द्यावे यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी नेहा भोसले यांना लेखी व तोंडी निवेदने देण्यात आली होती. त्यानंतर शेवटचे निवेदन दिनांक ३ नोव्हेंबर २०२३ रोजी देऊन, आंदोलनाचा इशारा देण्यात आला होता. मात्र याचे गांभीर्य सहाय्यक जिल्हा अधिकारी तथा एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी नेहा भोसले यांनी न घेतल्यामुळे आज दिनांक ७ नोव्हेंबर २०२३ रोजी सकाळी ११ वा पासून शिवसेनेच्या वतीने हातात काळे झेंडे घेऊन प्रकल्प अधिकार्यांचा निषेध करण्यात आला तसेच आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयाच्या दारावर ठिय्या आंदोलन करण्यात आले, त्यामुळे एकही कर्मचारी आत किंवा बाहेर जाऊ शकत नव्हता. शिवसेना जिंदाबादच्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता. अखेर या आंदोलनाची दखल घेत प्रकल्प अधिकारी नेहा भोसले यांनी येऊन आंदोलकांची भेट घेतली व राजीव गांधी क्रीडांगण पुर्णपणे नुतनीकरण करण्याचे आश्वासन दिले. तसेच तातडीने १४९९५०६ रु. इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करून कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग जव्हार यांना बीडीएस प्रणाली द्वारे सदर पहिल्या टप्प्यातील रक्कम वर्ग करण्यात आली.तशा आशयाचे लेखी पत्र देखील आंदोलकांना देण्यात आले व सदर काम तातडीने करण्याच्या सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात आल्या. त्यामुळे हे आंदोलन स्थगित करण्यात आले. या आंदोलनात विक्रमगड विधानसभा समन्वयक विजय अंभिरे , तालुकाप्रमुख श्रावण खरपडे, तालुका संघटक चित्रांगण घोलप,शहर प्रमुख परेश पटेल,उप शहर प्रमुख साईनाथ नवले, पप्पू सावंत,जनकल्याण पतसंस्थेचे संचालक शकील कुणमाळी, नरेश महाले, नदीम चाबुकस्वार,महिला आघाडीच्या सौ.संगीता जाधव, सौ.कल्पना आयरे,सौ.कांचनताई चुंबळे तसेच बहुसंख्येने शिवसैनिक उपस्थित होते.



# ग्रामपंचायत निवडणूक : अटीतटीच्या लढतीत तालुक्यात महिला राज

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात रविवार झालेल्या ग्रामपंचायत निवडणूक अटीतटीच्या झाली व चारही ग्रामपंचायतीत महिला राज दिसून आले. तालुक्यात रसुलपूरा घोडेगाव तीसगाव व तीसगाव तांडा चार ठिकाणी ग्रामपंचायत सर्वत्रीक निवडणूक घेण्यात आली.

त्याची निवडणूक मत मोजणी दि.६ तहसील कार्यालयात तहसीलदार स्वरुप कंकाळ यांच्या अध्यक्षतेखाली तथा उपस्थितीत पार पडली.विजयी उमेदवार याप्रमाणे रसुलपूरा सरपंच आश्वीनी बनसोड, ग्रामपंचायत सदस्य देविदास बनसोड,मुसा पठाण, हिना पठाण, हलीमा बि. पठाण, साजेद पठाण, कडु बी. पठाण, आयेशा पठाण. घोडेगाव सरपंच सुनंदा जाधव, ग्रामपंचायत सदस्य, दगडु पवार, सविता अशाने,मंगल गोरे, गणेश जाधव, सुचिता घोडके, वैशाली जाधव,शिवाजी मोरे, राजु आवारे, मंदा ठेंगडे, तीसगाव, सरपंच उज्वला काळे, ग्रामपंचायत सदस्य, संजय जगताप, सुनिता आव्हाड, योगेश मोरे, मंगल काळे, अनिल करपे, वैशाली घुसळे, लता जाधव, तिसगाव तांडा, सरपंच सुनिता राठोड ग्रामपंचायत सदस्य, पंडित राठोड,शीतल राठोड, रविंद्र चव्हाण, बद्रीनाथ चव्हाण, अनिता राठोड,कविता राठोड, तर मावसाळा ग्रामपंचायत पोटनिवडणूक रंजना दले, कनकशीळ ग्रामपंचायत पोटनिवडणूक लता निकम बिनविरोध अटीतटीच्या ठरलेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंचपदी महिलांना बाजी मारली हे विशेष.



# आई-वडिलांच्या हस्ते हॉटेलचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** शहरातील नावाजलीली न्यु पॉप्युलर हॉटेच जुन्यातुन नविन वास्तुत रूपांतर करून ग्रेट पॉप्युलर हॉटेलचे बस्टॉप जवळ मोठ्या थाटामाटात उदघाटन करण्यात आले. यावेळी आमदार उदयसिंग राजपुत, संजनाताई जाधव, उदयोजक मनोज पवार भगवान निकाळजे यांची प्रमुख उपस्थीती होती. हॉटेल पॉप्युलर म्हणजे मच्छी साठी एकच फेमस ताजे मासे खान्यासाठी खव्वायांची एकच गर्दी असते परंतु जागा कमी असल्याने प्रसिध्द मच्छी फ्राय ,मच्छी करी खान्यासाठी मच्छी प्रेमीनां तासन तास ताटकळत बसावे लागत होते परंतु आता खव्वांची आता प्रतीक्षा संपली असुन हॉटेल ग्रेट पॉप्युलर रेस्टारंन्ट आता नव्या रंगात व जेवणाची उत्तम सोय करून आता नागरीकांच्या सेवेत आले आहे.

या हॉटेलचे मालक सिध्दार्थ निकाळजे यांनी आपल्या आई वडीलांच्या हस्ते थाटा माटात उदघाटन करून सर्व हॉटेल चालकांमध्ये कौतुकास्पद कार्य केल्याने हॉटेल असोशियन मध्ये चर्चेचा विषय रंगत आहे.

या वेळी आमदार उदयसिंग राजपुत, संजनाताई जाधव, उदयोजक मनोज पवार, भगवानराव निकाळजे, भाजप शहर अध्यक्ष सुनिल पवार, सागर जाधव, डॉ . प्रविण पवार, संतोष निकम, संजय भारूका, उमेश नाटानी, बादल त्रिभवन, सरीता निकाळजे, सुरेखा निकाळजे, निलेश निकाळजे तसेच निकाळजे परीवारांची उपस्थाती होती.

Contoura Vision

चष्मा नको ?
चष्मा घालवा कायमचा.
डॉ.कांकरिया यांचे
साई सूर्य नेत्रसेवा,अहमदनगर तर्फे



लेसर नेत्र शस्त्रक्रिया शिबीर
'कॉन्टूरा व्हिजन' जगातील सर्वात प्रगत तंत्रज्ञान
मोतीबिंदू ,काचबिंदू , तिरळेपणावर उपचार

दि.१९ नोव्हें.२३, हॉटेल रविराज,बाबा पेट्रोल पंपाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)-(सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हे.२३, हॉटेल अन्विता, बीड (सकाळी १० ते १२),
दि.२५ नोव्हे.२३, हॉटेल पार्थ, लातूर (दुपारी ४ ते ६).

विशेष सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया केल्या जातील.
नोंदणी फिस रु.१००

9112288611
8888982222

# उत्कंठा वाढविणारं साहित्य म्हणजेच उत्तम साहित्य होय

## प्राचार्य डॉ. शोभा रोकडे : प्राचार्य डॉ.सुभाष गवई लिखित 'गोविंदभाऊ कहीन' पुस्तकाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुभाष गवई लिखित "गोविंदभाऊ कहीन" या व्यक्तिचरित्रात्मक पुस्तकाचे प्रकाशन नुकतेचं स्थानिक अमरावती येथील विमलाबाई देशमुख महाविद्यालयात मोठ्या थाटात संपन्न झाले.यावेळी अमरावती येथील विविध क्षेत्रातील मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते."हे पुस्तक विविध वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहे, त्यामुळे त्यांची, श्रीमंती कित्येक पटींनी वाढली आहे.जिज्ञासा, उत्कंठा वाढविणारं साहित्य हेचं उत्तम साहित्य असतं असं मी मानते,तेच साहित्य उत्तम होय, असे प्रतिपादन जेष्ठ साहित्यिका प्रा.डॉ. शोभाताई रोकडे यांनी या पुस्तकावर भाष्य करताना केले. अमरावती येथील जेष्ठ समाजसेवक तथा सेवाभावी व्यक्तिमत्त्व असलेले गोविंदजी कासट यांच्या जीवनातील विविध किस्से व अनुभव यावर आधारित असलेले "गोविंदभाऊ कहीन" हे पुस्तक जेष्ठ साहित्यिक श्री सुभाष गवई यांनी लिहिले असून या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा सृजन साहित्य संघ,शाखा अमरावती व मराठी विभाग, विमलाबाई महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता.अतिशय थाटात संपन्न झालेल्या या प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी विमलाबाई महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.स्मिताताई देशमुख, भाष्यकार म्हणून डॉ. शोभाताई रोकडे, प्रा.डॉ. सतीश तराळ, श्री गोविंदजी कासट व प्रकाशक संजय तराळ तसेचं सृजन साहित्य संघ शाखा अमरावतीचे अध्यक्ष, माजी जिल्हा शल्य चिकित्सक श्री श्यामसुंदरजी निकम, सचिव दीपकजी दारव्हेकर, उपाध्यक्ष व माजी अभियंता वा.पां.जाधव, मराठी विभाग प्रमुख मंदाताई नांदूरकर आदी मान्यवर प्रामुख्याने मंचावर उपस्थित होते.

"गोविंदभाऊ कहीन" हे पुस्तक तेवढ्याचं ताकदीने लिहून सेवाभावी गोविंदजी कासट समाजापुढे मांडणारे लेखक डॉ.सुभाष गवई यांचे त्यांनी डॉ शोभा रोकडे यांनी भरभरून कौतुक केले.गोविंदभाऊंच्या आयुष्याचे सिंहावलोकन म्हणजेचं "गोविंदभाऊ कहीन" हे पुस्तक आहे. असे प्रतिपादन प्राचार्य डॉ स्मिताताई देशमुख यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून केले.गोविंद भाऊ म्हणजे अवलिया माणूस सहजपणे चर्चा करतांना उलगडलेले गोविंदभाऊंच्या आयुष्यातील विविध पैलू समाजापुढे मांडण्याचा मी केलेला एक प्रामाणिक प्रयत्न म्हणजेचं "गोविदभाऊ कहीन" हे पुस्तक आहे, असे प्रतिपादन या पुस्तकाचे लेखक व जेष्ठ साहित्यिक प्रा.डॉ.सुभाष गवई यांनी केले. अनुशासन आणि जिद्द याचं दुसरं नाव म्हणजेचं




गोविंदभाऊ कासट. अशा शब्दांत कार्यक्रमाचे मुख्य आयोजक व सृजन साहित्य संघ शाखा अमरावतीचे अध्यक्ष डॉ.श्यामसुंदर निकम यांनी केले. आपल्या भाषणातून त्यांनी गोविंदभाऊंचा यथोचित परिचय करून दिला. मात्र माझ्यावर पुस्तक लिहिल्या जावं एवढा मी मोठा नसून असे अनुभव सर्वांच्याचं आयुष्यात येत असतात.मी फक्त माणसं जोडण्याचे काम करतो. गोविंदभाऊ मित्रमंडळात येण्यासाठी काही कुणालाही फॉर्म भरावा लागत नाही. ते सर्वांसाठी खुले आहे. जो एकदा भेटतो. तो कायमचा मित्र होऊन जातो, अशी विनम्रता जेष्ठ समाजसेवक गोविंदजी कासट यांनी आपला सत्कार स्वीकारतांना केले.यावेळी लेखक डॉ.सुभाष गवई व डॉ गोविंद कासट यांचा मानपत्र, स्मृतिचिन्ह, शाल, बुके व ग्रंथ देऊन सृजन साहित्य संघाच्या सर्व पदाधिकार्यांनी भावपूर्ण सत्कार केला.मानपत्राचे लेखन डॉ शोभा रोकडे यांनी तर वाचन डॉ मंदा नांदूरकर व संदिप देशमुख यांनी केले. कथालेखक विशाल मोहोड, कवी संदीप देशमुख,खुशाल गुल्हाने, संवेदना बहुद्देशीय संस्थेचे अध्यक्ष गजानन काकडे,साहित्य प्रवाह त्रैमासिकाचे संपादक विशाल कन्हेरकर यांचा शाल, पुष्पगुच्छ आणि पुस्तक देऊन यावेळी सत्कार करण्यात आला. शुभेच्छा पत्राचे वाचन विशाल मोहोड यांनी तर परिचय खुशाल गुल्हाने यांनी करून दिला. या कार्यक्रमाचे उत्कृष्ट संचालन प्रा. डॉ. मीता कांबळे यांनी तर आभार प्रदर्शन सृजनचे सचिव दीपक दारव्हेकर यांनी मानले. कार्यक्रमाला अमरावती शहरातील विविध मान्यवरांसह गोविंदभाऊ मित्रमंडळातील सर्वच सदस्य, धीरुभाई छांगाणी, भालचंद्र रेवने, राजेश पदडी, चौधरी, डॉ. खांबरे सुरेंद्र चापोरकर, तसेचं सृजन साहित्य संघातील गजानन काकडे, खुशाल गुल्हाने, विनोद तिरमारे नयन पर्हाड, संजीवनीताई काळे, प्रभाताई आवारे, कुमुदिनी इंगळे, कांचनताई ऊल्हे, कल्पना विघे, आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.

# महामानवाच्या शाळेत विद्यार्थी दिन साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**सातारा :** ७ नोव्हेंबर १९०० रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी साताऱ्यातील गव्हर्नमेंट हायस्कूल मध्ये (आताचे प्रतापसिंह हायस्कूल) इयत्ता पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतला होता.आज डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा ७ नोव्हेंबर हा शाळा प्रवेश दिन विद्यार्थी दिवस म्हणून साजरा केला जात असतो.या शाळेत त्यांनी ७ नोव्हेंबर १९०० ते १९०४ पर्यंत इयत्ता पहिलीपासून ते इयत्ता चौथीपर्यंत इंग्रजीतून शिक्षण घेतले.आजही शाळेच्या रजिस्टर मध्ये १९१४ या अनुक्रमांकावर भिवा हे नाव पाहायला मिळते. याच दिनाचे औचित्य साधून साताऱ्याच्या प्रतापसिंह हायस्कूल मध्ये शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शिक्षण व समाजकल्याण विभाग जिल्हा परिषद सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करत विद्यार्थी दिवस साजरा करण्यात आला. तसेच एक वही,एक पेन"अभियान सुध्दा राबविण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाच्या उद्देशिकेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. तसेच समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. यावेळी कार्यक्रम प्रसंगी संतोष खराडे, नितीन उबाळे, इतापे मॅडम, प्रमुख वक्ते प्रा. केशव पवार,प्रवीण धस्के, अरुण जावळे, शिक्षणाधिकारी शबनम मुजावर आदीसह शिक्षक वृंद, विद्यार्थी व इतर उपस्थित होते.कार्यक्रम प्रसंगी माजी आमदार जे.पी.गावित, आमदार विनोद निकोले तसेच उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. पुसेगाव येथील जिल्हा परिषद शाळेत शिकत असलेल्या सृजना भगवान सरवदे या



**येत्या काळात भारताचे संविधान हे जगाचे संविधान होईल–प्रा .केशव पवार**

ज्या डॉ .बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाचे संविधान लिहिले, त्या संविधाना मुळेच आजचा समाज हक्क अधिकार घेत आहे . येत्या काळात भारताचे संविधान हे जगाचे संविधान होईल . जगात ठीक ठिकाणी अन्याय अत्याचाराचे प्रमाण वाढलेले आहेत . गरीबी दारिद्र्य हे सुद्धा मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे . भारतीय संविधानातील मार्गदर्शक तत्वे जगाला आवश्यक आहेत . संत तुकारामा पासून ते संत कबीर, संत ज्ञानेश्वरा पर्यंतच्या संतांचे विचार म्हणजेच संविधान आहे . साताऱ्याची हीच शाळा जागतिक वारसा बनले पाहिजे .संशोधन केंद्र बनले पाहिजे . बाबासाहेबांच्या पावलावर पाऊल टाकून पुढे गेले पाहिजे . शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा हा बाबासाहेबांचा संदेश मोलाचा आहे . ही शाळा प्रेरणा स्थान असून जगाच्या दृष्टीने आदर्शवादी ठरली पाहिजे . आपण शिक्षण आणि महामानवाच्या विचारांच्या माध्यमातून आदर्शवादी मूल्ये समाजात रुजवायला हवीत .लोकशाहीचे पाईक म्हणून संविधानातील मार्गदर्शक तत्वे पुढे आणली पाहिजेत .

चिमुकल्या विद्यार्थीनींने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधनारे भाषण केले.यावेळी उपस्थित असलेल्या सर्वांनीच तिचे विशेष कौतुक केले.मान्यवरांनी मनोगते व्यक्त केली.प्रा. केशव पवार यांनी प्रमुख वक्ते म्हणून विशेष मार्गदर्शन केले.यावेळी त्यांनी बाबासाहेबांच्या साताऱ्यातील शैक्षणिक प्रवासाबद्दल महत्वपूर्ण अशी माहिती सांगितली.तसेच त्यांनी भारतीय संविधाना बाबत विचार मंथन केले.विद्यार्थ्यांना शालेय साहित्य सुद्धा वाटप करण्यात आले.यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सन्मान सोहळा संपन्न करण्यात आला. साताऱ्यासह जिल्हयातून आलेल्या आंबेडकर अनुयायांनी उपस्थिती दर्शवित डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले.तसेच कार्यक्रम प्रसंगी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी यांच्या वतीने लावण्यात आलेला विविध पुस्तकांचा स्टॉल पाहायला मिळाला. यांमध्ये भारतीय संविधान व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार मांडणारी पुस्तके विशेष सवलीत देण्यात आली.पुस्तके घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी लोकांनी केली होती.

# मतदान केंद्रांवर नक्षली हल्ले, तीन जिल्ह्यांमध्ये चकमकी

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** छत्तीसगड विधानसभा निवडणुकीसाठी आज सकाळपासून मतदान सुरू आहे. नक्षलवाद्यांनी मतदान केंद्रांवर हल्ले केल्याची धक्कादायक बातमी समोर आली आहे. छत्तीसगडच्या कांकेर जिल्ह्यातील बांदा पोलीस ठाण्याच्या हद्दीत नक्षलवादी आणि सीमा सुरक्षा बल तसेच डीआरजी जवानांमध्ये चकमक झाली आहे. संरक्षण अधिकाऱ्यांनी घटनास्थळावरून एके ४७ रायफल जप्त केल्या आहेत. या चकमकीनंतर बांद्यासह आसपासच्या भागात सर्च ऑपरेशन हाती घेण्यात आलं आहे. या चकमकीत काही नक्षलवादी जखमी झाले असावेत असा अंदाज वर्तवला आहे. कांकेरचे पोलीस अधीक्षक दिव्यांग पटेल यांनी या चकमकीच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. पोलिसांनी सांगितले की, नक्षलवाद्यांकडे एके ४७ सारख्या रायफल असून ते अत्याधुनिक शस्त्रास्त्रांसह हल्ले करत आहेत. ही चकमक मतदान केंद्रापासून हाकेच्या अंतरवर घडली आहे. दुपारी एकच्या सुमारास सुरक्षा बल आणि नक्षलवाद्यांमध्ये ही चकमक झाली. या चकमकीमुळे काही वेळ मतदान केंद्रावर गोंधळ उडाला होता. दुसऱ्या बाजूला सुकमा आणि नारायणपूर जिल्ह्यातही नक्षलवादी आणि सुरक्षा बलाच्या जवानांमध्ये चकमक झाल्याचे वृत्तसमोर आले आहे. सुकमा येथे झालेल्या चकमखीत काही जवान जखमी झाले आहेत. सुकमाच्या ताडमेटला आणि दुलेट गावाच्या दरम्यान सीआरपीएफ जवान आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. तर कोब्रा २०६ पथकाच्या जवानांबरोबरची चकमक बराच वेळ चालू होती. मीनपा भागात मतदान अधिकारी-कर्मचाऱ्यांना (पोलिंग पार्टी) संरक्षण देण्यासाठी जंगलांमध्ये संरक्षण दलाचे जवान तैनात करण्यात आले आहेत. सुकमात झालेली चकमक २० मिनिटे चालली. या चकमकीदरम्यान, दोन्ही बाजूने गोळीबार झाला. या चकमकीतही काही जवान जखमी झाले आहेत. तसेच जवानांनी काही नक्षलवाद्यांना मृतदेह खांद्यावर घेऊन पळून जाताना पाहिले. चकमक झाली त्या ठिकाणी रक्ताचे डाग पाहायला मिळाले आहेत. यावरून काही नक्षली जखमी झाल्याचे पोलिसांनी सांगितले.

# कागदी घोडे नाचवत पाणंद रस्ते योजना कोमात

आधुनिक केसरी न्यूज

**दिंडोरी :** महविकास आघाडी सरकारच्या काळात दिंडोरी तालुक्यातील 156 कि.मी. रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी मनरेगा मधून मातोश्री पाणंद रस्ते दुरुस्ती योजनेंतर्गत सुमारे 25 कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली मात्र दिंडोरी पंचायत समितीच्या उदासीनतेमुळे ही सर्व कामे अद्याप सुरू होवू शकली नाही कागदी घोडे नाचवत ही योजना बासनात गुंडाळून ठेवल्याचे दिसून येत आहे यासंदर्भात सविस्तर वृत्त असे की, शासन निर्णय शासन निर्णय मग्रारो-2022/प्र.क्र.02/रोहयो-06अ दि.27 एप्रिल 2022 व शासन निर्णय मग्रारो2022/प्र.क्र.73/रोहयो-06अ दि 03 जून 2022 नुसार दिंडोरी तालुक्यातील 156 किलो मिटर शिवार रस्त्यांच्या कामांना कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला या सर्व कामांच्या कार्यारंभ आदेश देण्याचे अधिकार पंचायत समिती गटविकास अधिकारी यांना देण्यात आले होते. शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार या सर्व कामांचे जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांनी अंदाजपत्रक तयार करून गटविकास अधिकारी यांच्या मान्यतेने कार्यारंभ आदेश वितरित करणे अपेक्षित होते या सर्व कामांसाठी ६०टक्के कुशल व ४० टक्के अकुशल अशा स्वरूपात निधी खर्च करणे बंधनकारक आहे तसेच ही सर्व कामे ग्रामपंचायत व रोजगार हमी विभाग यांच्या संयुक्त यंत्रनेमार्फत करण्यात येणार असल्यामुळे एरव्ही अधिकारी व ठेकेदार यांच्यातील "अर्थ पूर्ण" घडामोडींच्या बळावर रातोरात निविदा काढण्यापासून तर कार्यारंभ आदेश व निधी वर्ग करण्यापर्यंतचा प्रवास होणाऱ्या फाईली गेली दीड वर्ष अक्षरशः धूळ खात पडून आहेत. तालुक्यातील रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय झालेली असताना विधानसभेचे उपाध्यक्ष ना नरहरी झिरवाळ यांच्यासारखा उच्चपदस्थ लोकप्रतनिधीं तालुक्याला लाभून सुधा केवळ प्रशासनाच्या आडमुठ्या धोरणामुळे इतक्या मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त होवून देखील तालुक्याच्या विकासाला खीळ बसल्याचे विदारक चित्र निर्माण झाले आहे. प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या



उदासिनते मुळे तालुक्यातील लोकप्रतिनिधीं हतबल असल्याची परिस्थिती आहे. मुळात जिल्हा परिषद व पंचायत समिती वर्तुळात ठेकेदार लॉबी चां वरदहस्त असल्याशिवाय एकही कागद जागेवरून हलत नाही

१)मनरेगा मार्फत राबविण्यात येत असलेल्या मातोश्री पाणंद रस्ते दुरुस्ती योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात कामे मंजूर करण्यात आली या कामासाठी 40 टक्के रोहयो मजुरी व 60 टक्के कुशल कामासाठी असे निधीचे वर्गीकरण आहे त्यामुळे ठेकेदार लॉबी या कामाच्या बाबत हात राखून आहे मी स्वत : सरपंच या नात्याने गेली दीड वर्ष पंचायत समितीत हेलपाटे मारून देखील केवळ अधिकारी वर्गाच्या असहकर्यामुळे अद्याप एकही रस्त्याचे काम सुरू होवू शकले नाही मात्र याच विभागाच्या लेखाशिर्ष 95/05 अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कामांना केवळ 5 मजुरी व 95 टक्के कुशल कामांसाठी निधी उपलब्ध होणार असल्यामुळे ठेकेदार यंत्रणा या कामात सक्रिय झाली असून अधिकारी वर्गाने देखील या कामासाठी "एकमेका साहाय्य करू... !" धोरण अवलंबले असल्याचे चित्र आहे . **वसंतराव कावळे, सरपंच बोपेगाव ता .दिंडोरी**

2) दिंडोरी तालुक्यातील 156 कि .मी . रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी मनरेगा मधून मातोश्री पाणंद रस्ते दुरुस्ती योजनेंतर्गत सुमारे 25 कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी मिळाली असून याच विभागाच्या लेखाशिर्ष 95/05 अंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या जास्तीत जास्त कामांना येत्या नोव्हेंबर अखेर पर्यंत कार्यारंभ आदेश ग्रामसेवकांमार्फत देण्यात येणार असल्याचे गटविकास अधिकारी नम्रता जगताप यांनी सांगितले .

हे वास्तव सर्वमान्य आहे यात अधिकारी व ठेकेदार यांच्यातील अभद्र युती ग्रामपंचायत यंत्रेनेमार्फत होणारी कोणतीही कामे इतक्या सहजतेने कशी होवू देतील अशी चर्चा दबक्या आवाजात तालुक्यात सुरू आहे त्यात राज्याच्या मुख्यमंत्री, राज्यपाल, सर्व वजनदार मंत्र्यासोबत सलोख्याचे सबंध असलेल्या विधानसभा उपाध्यक्ष यांच्या मतदार संघात या योजनेंतर्गत दीड वर्षात एकही रस्त्याचे काम सुरू होवू शकले नाही हे विशेष आहे. तालुक्यात अनेक सरपंच, ग्रामपंचायत सदस्य या कामांसाठी कार्यारंभ आदेश मिळावे म्हणून पंचायत समितीचे उंबरठे झिजवून थकले परंतु अद्याप या संदर्भात कोणताही आशेचा किरण दिसून येत नसून लोकप्रतिनधींकडून देखील या दिरंगाईला जबाबदार अधिकाऱ्यांना पाठीशी घालून नक्की काय साध्य केले जाणार आहे हे तालुक्यातील जनेतेला समजायला मार्ग नाही.

# इगतपुरी तालुक्यातील १६ ग्रामपंचायत निवडणुकीत युवकांचाच भरणा..!

## महिनाभर गावांत पाय न ठेवता मिळवली एकहाती सत्ता, राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस बोडके यांची कमाल

आधुनिक केसरी न्यूज

**विक्रम पासलकर**

**इगतपुरी :** तालुक्यातील१६ ग्रामपंचायतींच्या निवडणुकीचा निकाल नुकताच लागलाआहे. ग्रामपंचायतीचे लागलेले निकाल पाहता जवळपास सर्वच ठिकाणी युवकांचे निर्विवाद वर्चस्व दिसुन आले आहे. तर दौंडत ग्रामपंचायतीत ज्येष्ठ शेतकरी नेते पांडुरंग शिंदे यांच्या रूपाने बुजुर्ग चेहरा सत्तेत टिकून राहिला आहे. गत पंचवार्षिक मध्ये त्यांच्या सौभाग्यवती थेट सरपंच होत्या, यावेळी ते थेट निवडून आले आहे.

तहसीलदार अभिजित बारवकर यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी संपन्न झाली. पोलीस यंत्रणेकडून चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या निवडणुकीचे वैशिष्ट म्हणजे गेल्या पंचविस वर्षांपासून प्रशासकीय राजवटीखाली असलेल्या नांदगांव सदो ग्रामपंचातीला 25 वर्षांनंतर लोकशाही मार्गाने ग्रा पं सदस्य मिळाले असले तरी आरक्षण अभावी सरपंच पद मात्र रिक्त राहिले आहे. यंदा प्रथमच नियोजन पद्धतीने मतमोजणी पार पडली कुठेही गोंगाट न होता शिस्तबद्ध पद्धतीने निकाल लागला. विजयाची आतुरतेने वाट पाहणारे उमेदवार आणि त्यांच्या समर्थक कार्यकर्त्यांनी गुलालाची उधळण करीत विजयोत्सव साजरा केला. ह्या मतमोजणीसाठी तालुका प्रशासनाने याआधी झालेल्या मतमोजणीपेक्षा अतिशय सुंदर आणि चोख नियोजन केले. याबद्धल सर्वांनी प्रशासनाचे कौतुक केले आहे.



**एक महिना गावात न येता मिळवली एक हाती सता :** तालुक्यातील मोडाळे,शिरसाठे आणि कुशेगाव या तीन ग्रामपंचायतींवर राष्ट्रवादी कॉंग्रेस ( अजित पवार ) गटाचे प्रदेश सरचिटणीस गोरख बोड़के यांच्या नेतृत्वाखाली एकहाती सत्ता आली आहे . मोड़ाळे येथे सरपंचपदी शिल्पा आहेर व सदस्य पदी वंदना गो–हे निवडून आल्या आहेत,त्या दोघिहि बोड़के यांच्या भाची आहेत . शिवाय शिरसाठे येथे उच्च विभूषित सुनीता सदगिर ह्या सरपंच पदी विजयी झाल्या आहे . कुशेगावात एकनाथ कातोरे निवडून आले . वरील तिन्ही गावांत बोड़के यांना माननारे नागरिक आहेत . तालुक्यात बोड़के यांच्या शब्दाला वेगळी किमत आहे . म्हणून वरील तिन्हीहि गावे बिनविरोध होण्यासाठी त्यानी सुरुवातीला खूप प्रयत्न केले खरे परंतु अखेरच्या क्षणि काही लोकांनी आपले उमेदवारी अर्ज दाखल करुण निवडणूक बिनविरोध होऊ नए म्हणून जाणून बुजुन अर्ज दाखल केले . अखेर निवडणूक प्रचार सुरु झाल्या पासून तर निकाल लागे पर्यंत जवळपास एक महीना 3 दिवस बोड़के यांनी तिन्ही ही गावांत पाय ठेवला नही की मतदानाला ते आले नाही . तरीही त्यांच्या गटाच्या उमेदवारां नी बोड़के यांचा फ़ोटो घेवून व त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रचार केला . मतदारानी त्यांचेकडे व त्यांचे काम बघून तिन्हीहि गावांत त्यांचे उमेदवार विजयी केले आहेत हे विशेष . मोड़ाळे ही राज्यस्तरीय प्रथम क्रमांक मिळवलेली तालुक्यातील पहिली पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत आहे .



**विजयी उमेदवार पुढील प्रमाणे**

ओंडली - सरपंच प्रकाश बाळु खडके, महादु खातळे, सविता लोते, रूपाली खातळे, सिताराम वाघ, सविता खातळे, चंद्रकांत वाघ, बेबीताई शेंडे मोगरे - सरपंच सरपंच प्रताप विठ्ठल जाखेरे, सदस्य भाऊसाहेब जाखेरे, शिवाजी जाखेरे, सोनी गवारी, दत्तु गवारी, आक्का गवारी, चंद्रभागा जाखेरे, योगिता उघडे, एकनाथ नाडेकर, सिता जाखेरे

**दौंडत** – सरपंच पांडुरंग शिंदे, सदस्य संजय शिंदे, ज्ञानेश्वर शिंदे, दिलीप बोराडे, जया बोराडे, मीनाक्षी उदावंत, रत्ना गावंडे, स्मिता शिंदे **कुशेगांव** – एकनाथ गुलाब कातोरे, सदस्य वंदना सोनवणे,गोटीराम हंबीर, पारू सराई, येसू सराई, कमळाबाई पारधी, ताईबाई आगिवले, बबन खडके, गणेश सराई, चिऊबाई आगिवले. **घोटी खुर्द** – सरपंच माणिक बिन्नोर, **सोमज** – सरपंच जिजाबाई काशिनाथ कुंदे, सदस्य लक्ष्मण कुंदे, म्हाळसाबाई कुंदे, शैलाबाई कोरडे, सत्यभामा कुंदे, **कृष्णनगर** – सरपंच वैशाली आंबवणे, सदस्य वाल्मीक तारडे, गणेश धोंगडे, लक्ष्मण पारवे, अनिता धोंगडे, अशोक जाधव, **लक्ष्मीनगर** – सरपंच सावित्री जोशी, सदस्य विजय दराणे, सुनीता दराणे, अर्चना मेमाणे, सुदाम बेंडकोळी, आशा जोशी, रामदास डोके, जनाबाई डोके, **मोडाळे** – सरपंच शिल्पा आहेर, सदस्य सीताबाई जगताप, मंदा बोडके, गोरख गोऱ्हे, आशा गांगड, वनिता गोऱ्हे, सुरेश लहांगे, गणेश ढोन्नर, ज्ञानेश्वर झोले, काजल बिन्नर

**नागोसली** – सरपंच काशिनाथ होले, सदस्य अशोक शिंदे, सुरेखा ढापटे, श्वेता गडाळे, आशा गिऱ्हे, लक्ष्मण शिद, सुमन मुतडक, **धारगांव** – सरपंच रेश्मा पुंजारा, सदस्य शिला गोवर्धने **शिरसाठे** – सरपंच सुनीता सदगीर, सदस्य अनिता चंदगीर, दशरथ ढोन्नर, वर्षा बोडके, **टाके घोटी** – सरपंच माधुरी आडोळे, सदस्य संगीता मदन लहाने, पूजा मनोज भगत, प्रदीप दालभगत, कार्तिक आडोळे, कल्पना दोंदे, माधुरी आडोळे, **आडवण** – सरपंच निकिता आघाण, सदस्य धोंडीराम रेरे, तानाजी कोकणे, संगीता रेरे, यशवंता आघाण, मथाबाई कडाळे, नंदाबाई डाके, पांडुरंग कोकणे, माधवी डोळस, मीना आघाण

**नांदगांव सदो** – सरपंच रिक्त असुन सदस्य पदी लीलावती भागडे, दुर्गेश भागडे, भिवा भागडे, **उंबरकोन** – सरपंच आत्माराम सारुक्ते, सदस्य काळू सारुक्ते, संजय सारुक्ते, गंगुबाई सारुक्ते, मच्छिन्द्र चेमटे, सुनंदा शिंदे, रोहिणी जगताप, वंदना सारुक्ते विजयी झाले आहेत.

# खेड बुद्रुक येथील विनोद रासकर यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** खेड बुद्रुक ता.खंडाळा येथील विनोद श्रीपती रासकर यांचे दि.६ नोव्हेंबर रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या अचानक जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मोठा भाऊ, भावजय एक पुतण्या व पुतणी असा परिवार आहे.ते मुंबई येथे मंत्रालयामध्ये शिक्षण विभागात सहसचिव म्हणून कार्यरत होते. खेड बुद्रुक गावांत ते सामाजिक कार्यात सहभगी होत असत. नवतरुण गणेशोत्सव मंडळाचे मार्गदर्शक म्हणून मंडळाच्या कार्यकर्त्यांना ते मार्गदर्शन करत असायचे. विनोद रासकर हे बाबू या नावाने सर्वपरिचित होते. त्यांना ह्रदय विकाराचा झटका आल्याने त्यांची प्राणज्योत मालवली. खेड बु!व पंचक्रोशीतील नागरीक हळहळ व्यक्त करत आहेत. युवकांच्या मनात मार्गदर्शक म्हणून एक मानाचे स्थान निर्माण केल्याने ते सर्वांसाठी चांगले व्यक्तिमत्व होते. त्यांच्या जाण्याने खूप मोठी न भरून येणारी पोकळी निर्माण झाली आहे. एक नव्या पिढीला प्रेरणा देणारा मार्गदर्शक हरपला असा मार्गदर्शक पुन्हा होणे नाही अशी चर्चा सर्वत्र होत आहे.



# मराठा आरक्षण: उपोषण रस्ता रोको स्थगित

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यात सुरू असलेल्या मराठा आरक्षणला घेवून सर्वत्र बसेस बंद करण्यात आल्या होत्या त्यामुळे प्रवासी नागरीकांचे ये जा साठी हाल झाले होते. परंतु मराठा आरक्षण चे उपोषण रस्ता रोको ला स्थगिती असल्याने पुन्हा बसेस पुर्ववत सुरु झाल्या आहे. बाजारसावंगी येथून कन्नड आगाराच्या फुलंब्री- कन्नड दिवसांतून चार बसेस दोन दोन फेऱ्या करतात तर छत्रपती संभाजीनगरच्या दोन बसेस फेऱ्या करतात तालुक्यात सर्वच आगाराच्या बसेस बंद झाल्याने प्रवासी नागरिक विद्यार्थी व्यापारी नौकरदार यांचे हाल सुरु होते परंतु सर्वत्र शांतता असल्याने तालुक्यात पुन्हा बसेस पुर्ववत सुरु झाल्या आहे.त्यामुळे प्रवासी नागरिकांना दिलासा तथा सुविधा मिळाल्याने प्रवाशातून आनंद व्यक्त करण्यात येत आहे.



# शब्द शंकरपाळी साहित्य समूहाचा वर्धापनदिनी दिवाळी विशेषांक मुंबईत प्रकाशित

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** मराठी साहित्यिक क्षेत्रातील एकमेव ओळख निर्माण करणारा साहित्यिक समूह म्हणजेच "शब्द शंकरपाळी साहित्य समूह, मुंबई." रविवारी दिनांक ०५ नोव्हेंबर २०२३ दादर, मुंबई येथे या साहित्यिक समूहाचा तृतीय वर्धापन दिन आणि दिवाळी विशेषांक प्रकाशित झाला. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने आरती सशीतल यांच्या शुभहस्ते करण्यात आली. त्यानंतर आरती सशीतल, अवंतिका महाडिक, शलाका कोठावदे, आणि प्रदीप बडदे यांनी महाराष्ट्र गीत गायल्याने कार्यक्रमाची रंगत आजून वाढली. या दरम्यान भूषण तांबे यांचे संपादकीय मनोगत झाल्यावर दिवाळी विशेषांकाचे प्रकाशन विजया माणगावकर आणि रंजना अय्यर यांच्या शुभहस्ते झाले. कार्यक्रमाचे दुसरे सत्र होते सत्कार समारंभ आणि गुणगौरव सोहळा. उपस्थित सदस्यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, भेटवस्तू, मिठाई, दिवाळी अंक आणि किट बॅग देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून साहित्यिकांनी या कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थिती नोंदविली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रज्ञा दळवी यांनी केले तर विघ्नेश पाष्टे, सचिन पाटील, मेघा सावंत, शलाका कोठावदे, रामचंद्र कळंबाटे, श्रीगणेश शेंडे, निता नावरकर, तनुजा प्रधान, भास्कर आग्रे, विकास पाटील यांचे विशेष सहकार्य लाभले. या साहित्यिक सोहळ्यात अजिंक्य गोमाने, पद्माकर भावे, माला मेश्राम, शुभांगी कुलकर्णी, श्रद्धा खानापूरकर, विनोद तुलालवार, अनघा सावर्डेकर, रजनी निकाळजे, मृगनयना भजगवरे, गीतांजली वाघ, सारंग सबनीस, मृणाल पेंडसे, दक्षा संखे, सुरेखा गद्रे, नूतन ओतुरकर, इत्यादी सदस्य उपस्थित होते आणि त्यांनी त्यांचा वैयक्तिक अभिप्राय नोंदवून या साहित्यिक समूहास आणि दिवाळी विशेषांकास खूप साऱ्या शुभेच्छा दिल्या.



# नगरपालिका मुख्याधिकारी व कर्मचारी यांची चौकशी करून गुन्हे दाखल करा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** येथील नगरपालिकेचे मुख्याधिकारी व कर्मचारी यांनी संगनमताने शासनाच्या मोफत अभ्यासिका योजने अंतर्गत खरेदी केलेल्या साहित्यात लाखों रुपयांचा भ्रष्टाचार केला आहे. या कामाची चौकशी करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करा, अशी मागणी कॉंग्रेस कमिटीचे तालुकाध्यक्ष राजेश मापारी यांनी पालकमंत्री दिलीप वळसे यांना दिलेल्या निवेदनाव्दारे केली आहे. महाराष्ट्र शासनाकडून गरीब होतकरू विद्यार्थीसाठी स्पर्धा परिक्षेची तयारी करण्यासाठी दलीत वस्ती अंतर्गत लोणार न.पा. ला जवळपास ६ लाख ८५००० हजार ऐवढा निधी डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलाचे शासकीय वस्तीगृह या ठिकाणी मोफत अभ्यासिका तयार करण्यासाठी निधी उपलब्ध शासनाकडून देण्यात आला होता. या मध्ये पुस्तक खरीदी कॉम्प्युटर, खुर्ची, टेबल थंड पाण्यासाठी वाटर कुलर इत्यादी साहित्य पुरवठा करण्याबाबत नमुद होतो. परंतु नगर पालिका लोणार मधील मुख्याधिकारी व त्याच्या अधिनस्थ कर्मचाऱ्यांनी लाखो रूपयाचा भष्ट्राचार करून जेवढे साहित्य या गरीब होतकरू मुलांना उपलब्ध करून द्यायला पाहीजे होते. त्यापैकी फक्त २५% एवं साहित्य उपलब्ध करून देऊन त्या होतकरू मुलांवर अन्याय केला आहे. शासनाने दिलेल्या निधीच्या मोठ्या प्रमाणात आपला स्वःतच्या आर्थिक फायद्यासाठी शासनाची सुध्दा फसवणुक केली आहे.यामुळे कृपया वरील बाबीची सखोल चौकशी करून न.पा. मुख्याधिकारी व कर्मचारी याच्यावर गुन्हे दाखल करून या कामातुन केलेली भष्ट्राचाराची रक्कम वसुल करण्यात यावी व दोषी मुख्याधिकारी व त्यांना साथ देणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून सदर रकमेची वसुली करून त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावे, अशी मागणी राजेश मापारी यांनी निवेदनातून जिल्ह्याचे पालकमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या कडे केली आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी) • त्वचा व गुप्त रोग • वजन वाढविणे
• आम वात उदर रोग • स्त्रीयांचे आजार • वजन कमी करणे
• दमा व ॲलर्जी (जुनाट) • स्थूलपणा, मूळव्याध • केसांच्या सर्व तक्रारी
• चिकन गुनिया • वंध्यत्व, संतती प्राप्ती • लहान मुलांची
• मनोकयीईक आजार • कॅन्सर सल्ला, मुतखडा • स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# बाळासाहेब लबडे यांच्या कादंबऱ्यांची गुणवत्ता बुकरच्या तोडीची

## ज्येष्ठ साहित्यिक भारत सासणे

आधुनिक केसरी न्यूज



**पुणे :** श्री दिपलक्ष्मी सहकारी पतसंस्था मर्यादित लि. सातारा आयोजित,"बाळासाहेब लबडे" यांची कादंबरीःस्वरूप आणि चिकित्सा"या विषयावरील परीसंवादाचे आयोजन नवीपेठ, पत्रकार भवन, पुणे येथे याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिरिष चिटणिस-पुणे शहर प्रतिनिधी, मसाप.अध्यक्ष दीपलक्ष्मी सहकारी पतसंस्था सातारा यांनी केले. यात बाळासाहेब लबडे यांनी या तिनही कादंबऱ्या आशय विषय शैली या दृष्टीने वेगळ्या लिहील्या आहेत त्या इंग्रजीत गेल्या पाहिजेत त्यांची गुणवत्ता ही बुकर पर्यंत आहे. जागतिक दर्जाच्या त्या आहेत. त्यानंतर निर्मिती प्रक्रिया भाष्य प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे (कादंबरीकार, कवी, गीतकार, गझलकार, समीक्षक, संपादक, अभ्यासक)यांनी केले.यात ते म्हणाले, चार मुंग्यांच्या अस्तित्वाच्या निर्मितीप्रक्रियेची गोष्ट  सांगणार आहे. माझी पिपिलिका मुक्तिधाम  ही २०१ ९ मध्ये ग्रंथाली प्रकाशनाने प्रकाशित केलेली पहिली कादंबरी आहे .ही कादंबरी लिहीत असताना माझ्या डोक्यात ही विचारप्रक्रिया कशी सुरू झाली ते ही कादंबरी कशी आकारास आली या सर्व प्रक्रियेला मी आपणासमोर मांडणार आहे. सर्वात प्रथम आपण शीर्षकाविषयी जाणून घेऊया. बऱ्याच जणांना "पिपिलिका" ह्या शब्दाचा अर्थ माहीत नव्हता. तशी विचारणा झाली. "पिपिलिका" हा संस्कृत शब्द आहे. त्याचा अर्थ मुंगी असा होतो. जुन्या काळापासून हा शब्द रूढ आहे. आध्यात्मिक क्षेत्रातील लोकांना हे माहीत असेल की, अध्यात्मात जे मुक्तीचे मार्ग सांगितले आहेत. त्यात एक मार्ग "पिपिलिका" मार्ग सांगितला आहे. मुक्तीचे चार प्रकार आहेत. सलोकता, समीपता, सरूपता, सायुज्यता. संत ज्ञानेश्वर त्याआधी चक्रधरस्वामी ते संत तुकारामांपर्यंत अनेकांनी "पिपिलिका" मार्गाचे वर्णन केले आहे. त्यांच्या विवेचनावरूनच मला हे कादंबरीचे शीर्षक सुचले . संत तुकारामांनी आपल्या स्वतःविषयी "पिपिलिकाच्या जाती" म्हटले आहे, तर संत ज्ञानेश्वर यांनी समुद्राच्या पलीकडे पाहण्याची दृष्टी ज्याची असते, स्वर्गीचा आवाज ज्याला ऐकू येतो आणि अशा मुंगीचे मनोगत ज्याला जाणता येते ती म्हणजे आई आणि अशा आईच्या हृदयाने परकाया प्रवेश करून मानवजातीतील जो तळ आहे तो तळ ढवळून काढावा आणि त्यांच्या जगण्याची दशा आणि दिशा मांडावी या हेतूने "पिपिलिका मुक्तिधाम" ही कादंबरी लिहिली आहे. त्यामुळे लेखकाकडे असावा लागतो, तो व्यापक मानवतावाद असे माझे मत आहे. त्यामुळे  कोणत्याही धर्माचे केवळ भंजन करणे हा हेतू यामागे नाही. धर्माच्या विविध वाटा ही कादंबरी सांगत जाते. मानवी जगण्याच्या कल्पना, तत्वज्ञान, धारणा, जीवनाविषयी असलेली अपार करुणा, दया, जिज्ञासा यामुळेच मला लिहावे वाटले "त्याबरोबरच त्यांनी इतर दोन कादंबर्यांची निर्मितीप्रक्रिया उलगडून दाखवली.
त्या या कादंबरीचं कथानक सांगण्यात फारसा मतलब नाही. कारण नि कादंबरीत वारंवार येणारा निवेदकाचा अलटर इगो असलेला आगंतुक व त्याद्वारे विविध रुपात चित्रित झालेली व्यक्तिरेखा, सतत स्वप्नात येणारा पंख असलेला घोडा, कचऱ्याच्या निमित्ताने घडणारी स्मशानाची सफर, त्याचं प्रेतं जाळायला आली की आनंदी होणं ... अशा  असंगत प्रसंग, किस्से व लोककथांच्या कथानातून जीवनातले तुटलेपण, संवादहिनता, नातेसंबधातली  निरार्थकता लेखक  एब्सर्ड फिक्शन शैलीत सांगत वाचकांना स्तिमित करतो."त्यानंतर "काळमेकर लाइव्ह" वर  प्रा.डॉं. दिपक बोरगावे (ज्येष्ठ समीक्षक,कवी,अनुवादक)म्हणाले
या अशा सांस्कृतिक, सामाजिक, मानसशास्त्रीय आणि तात्विक अर्थाने विस्कळीत आणि विघटित झालेल्या समाजात कोणतेच कथन होऊ शकत नाही. पारंपरिक कथनशास्त्राप्रमाणे आज आपणाला कोणताच घटनाक्रम सांगता येणे कठीण आहे. याचे मुख्य कारण म्हणजे 'घटना' हीच मुळात अस्तित्वात नाही. माणूस, समाज, व्यक्ती यांच्याप्रमाणेच तिही कोसळलेली आहे. व्यक्तीचे आणि समाजाचे हे कोसळलेपण या कादंबरीत येते (यालाच एक उत्तराधुनिक घटित म्हणावे लागेल). याचमुळे या कादंबरीत कोणी नायक, नायिका नाही. जर काही असतीलच, तर सगळेच नायक आणि सगळ्याच नायिका आहेत. आणि त्याचबरोबर प्रत्येक नायक आणि नायिकांचे क्षुद्रीकरण आणि कचराकरण  झाले आहेत. रहम्या, म्हातारा, बहुरूपीया आणि 'मी' अशी काही पात्रे या कादंबरीत येतात. पण ती पात्रे म्हणून कमी आणि आशय म्हणून अधिक येतात. 'मी' हा प्रथम पुरुषी निवेदक आहे. आणि तोच ही 'गोष्ट नसलेली' गोष्ट सांगतो आहे."त्यानंतर अध्यक्ष
भारत सासणे (ज्येष्ठ साहित्यिक, माजी अध्यक्ष अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन)यांनी आपले अध्यक्षिय मनोगत व्यक्त केले.यात त्यांनी मराठी कादंबरीतील नवता म्हणजे काय?साठोत्तरी कादंबरी,नव्वदोत्तरी कादंबरी याचा आढावा घेतला. ते पुढे म्हणाले,"प्रा डॉं बाळासाहेब लबडे यांची कादंबरी स्वरूप आणि चिकित्सा या विषयावर परिसंवादाचा विषय खूप महत्वपुर्ण आहे. बाळासाहेब लबडे हे आजचे नव कादंबरीकार आहेत. त्यांच्या तीन कादंबऱ्या ह्या मराठी साहित्याला नेमकं वेगळं देणे देतात. या कादंबऱ्यांवर समीक्षकांनी लिहीलं पाहिजे. हे उद्याचं भविष्य आणि आजचे वास्तव लिहीणारे लेखक आहे ज्यांना चांगलं व्हिजन आहे या कादंबर्या खरंच बुकरच्या गुणवत्तेच्या आहेत यासाठी त्या इंग्रजीत अनुवादीत झाल्या पाहिजेत आणि यावर चर्चासत्रांचे आयोजन केले गेले पाहिजे मराठी समीक्षकांनी बोलायला पाहिजे. या  दोन सूचना मी करतो. व्यापक नवा मानवतावाद मानवतावाद त्यांना अपेक्षित असावा, असे दिसते आहे. "उपस्थितांचे आभार डॉ. संजय बोरूडे यांनी मानले.

# होल्डिंग हँड्सतर्फे मोफत आरोग्य तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्था, महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि व्यवस्थापन शास्त्र विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने  महात्मा गांधी स्मारक निधी हॉल, समर्थनगर येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर पार पडले. यावेळी उद्घाटक म्हणून शासकीय कॅन्सर हॉस्पिटलचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड तर जे जे प्लस हॉस्पिटलचे न्यूरो सर्जन डॉ. जीवन राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. अरविंद गायकवाड यांनी बोलताना असे सांगितले की," जग बदलण्याचा प्रयत्न करू नका, स्वतः बदला म्हणजे जग आपोआप बदलेल." पुढे बोलताना डॉ. अरविंद गायकवाड यांनी निरोगी आरोग्याचा मंत्र सांगताना," तंबाखू, सिगारेट, अल्कोहोल ह्या गोष्टी टाळल्या पाहिजेत, रोज मैदानी खेळ खेळा, ४५ मिनिट फिरा, सिझन नुसार रोज दोन फळं खा, पाले भाज्या खा " असे सांगितले.  वजनाचे सूत्र सांगताना डॉ. गायकवाड सांगितले की, तुमची जर उंची १७५ सेंटिमीटर असेल तर आपले वजन ७५ किलो असावे. कॅन्सर बद्दल सांगताना डॉ. गायकवाड असे सांगितले की, शहरी भागातील महिलांना ब्रेस्ट कॅन्सर होतो तर ग्रामीण भागातील महिलांना गर्भाशयाचा कॅन्सर होतो आणि पुरुषांना फफ्फुसाचा, घशाचा, तोंडाचा आणि मोठ्या आतड्यांचा कॅन्सर होतो. कॅन्सरला कसं ओळखता आलं पाहिजे, यासाठी डॉ. अरविंद गायकवाड यांनी काही लक्षणे सांगितले, जसे, शरीरावर गाठ दुखणारी व न दुखणारी कोणतीही गाठ असेल तर तपासणी करून घ्या. शरीरावरील जखम अँटोबायोटिक घेऊन ही दुरुस्त होत नसेल तर, वजन अचानक कमी झालं असेल, आवाज घोगरा झाला असेल, शरीरातील छिद्रामधून विनाकारण रक्तस्त्राव होत असेल तर, पाळी मध्ये स्त्रियांमध्ये जास्त रक्षस्त्राव होत असेल तर, ही कॅन्सर ची लक्षणे सांगताना शासनाकडून काही योजना शासन अंतर्गत गरजूंना मदत मिळते, त्या अंतर्गत आपण कॅन्सरचे निदान करू शकता, असे डॉ. अरविंद गायकवाड यांनी सांगितले.

"पेशंट आणि डॉक्टर मधला दुवा आहोत आपण", असे सांगताना डॉ. जीवन राजपूत यांनी सांगितले की  सध्याच्या



काळात आजाराला वयोमर्यादा नाही, आधी ४० - ४५ नंतर शुगर व्हायची आता शुगर कुठल्याही वयात होऊ शकतो त्यामुळे सहा सहा महिन्याला आपले रुटीन चेकअप करून घेतले पाहिजे. पुढे बोलताना सांगितले की काही शासकीय योजनांचे कार्ड बनतात ते कार्ड काढून घेण्याचे आवाहन देखील केले.

यावेळी होल्डिंग हँडसचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सिरसीकर यांनी पाहुण्यांचे स्वागत केले तर महाराष्ट्र गांधी स्मारक निधीचे कार्याध्यक्ष डॉ. मच्छिंद्र गोर्डे यांनी आभार प्रदर्शन केले. सूत्रसंचालन संस्थेचे उपाध्यक्ष रवींद्र बनकर यांनी केले.

यावेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या व्यवस्थापन शास्त्र विभाग प्रमुख डॉ फारूख खान, मेडीकव्हरचे डॉ. योगेश जैन, शेखर सातपुते,  ॲड. अभय टाकसाळ, कैलाश अतकरे, प्राची सिरसिकर, भगवान वाघ, कोमल घोरपडे, अनघा गडलिंज, सुजाता जाधव, अर्पिता जाधव, अभिषेक घोबाले, आशिष इंगोले, श्रीकांत जाधव, अभिषेक गुंड, सागर भगत, विजय कुडाले, अनिकेत प्रधान, अनिकेत पगारे, अवनित कुडमाठे, अभिजित गंडाले, इंद्रकुमार जेवरीकर, सत्यनारायण ढवळे, महेश सिरसीकर, अर्चना नाशिककर, मंजुषा देशमुख  इत्यादींची उपस्थिती होती. आरोग्य तपासणीसाठी जे जे प्लस हॉस्पिटल आणि मेडीकव्हर हॉस्पिटलचे योगदान मिळाले.

# दहा रेल्वेंना बडनेरा स्थानकावर थांबा नाही

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** विभागीय मुख्यालय असलेल्या अमरावती शहरात तीन रेल्वे स्थानके असली, तरी रेल्वेसेवा अपुरीच असल्याचे चित्र आहे. बडनेरा रेल्वे स्थानकावरून जाणाऱ्या तब्बल दहा गाड्या बडनेरा रेल्वेस्थानकावर थांबत नाहीत. त्यातच आता पश्चिम रेल्वेने सुरत ते ब्रह्मपूरदरम्यान ८ नोव्हेंबरपासून विशेष रेल्वे चालविण्याचा निर्णय घेतला आहे, ही रेल्वे देखील बडनेरा स्थानकावर थांबणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे.
०९०६९ क्रमांकाची सुरत-ब्रह्मपूर विशेष एक्सप्रेस ८ नोव्हेंबर ते २७ डिसेंबर दरम्यान धावणार आहे. या गाडीच्या ८ फेऱ्या होणार आहेत. ८, १५, २२, २९ नोव्हेंबर, ६, १३, २२ आणि २९ डिसेंबर रोजी ही एक्सप्रेस सुरत रेल्वे स्थानकावरून सुटेल.
०९०७० क्रमांकाची ब्रह्मपूर-सुरत एक्सप्रेस १०,१७, २४ नोव्हेंबर तसेच १, ८, १५, २२ आणि २९ डिसेंबर रोजी धावणार आहे. ही एक्सप्रेस महाराष्ट्रात नंदूरबार, धरणगाव, पाळधी, जळगाव, भुसावळ, अकोला, वर्धा, बल्लारशाह येथे थांबणार आहे. आश्चर्य म्हणजे महत्वाच्या बडनेरा रेल्वे स्थानकावर या गाडीला थांबा देण्यात आलेला नाही.
दुसरीकडे, बडनेरा रेल्वे स्थानकावर हावडा ते मुंबईदरम्यान धावणाऱ्या तब्बल नऊ रेल्वेगाड्या थांबत नाहीत. त्यात कामाख्या-लोकमान्य टिळक टर्मिनस कर्मभूमी, टाटानगर अंत्योदय, पुरी-सुरत, हावडा-सीएसएमटी दुरांतो, भुवनेश्वर-लोकमान्य टिळक टर्मिनस, पुरी-गांधीधाम, पुरी-लोकमान्य टिळक टर्मिनस, हावडा-पुणे दुरांतो, हावडा-शिर्डी, या एक्स्प्रेस गाड्यांचा समावेश आहे. यातील काही रेल्वेगाड्या या वर्धा, अकोला या ठिकाणी थांबतात; पण बडनेरा स्थानकाला तेही भाग्य मिळू नये, ही शोकांतिका असून लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष त्यासाठी कारणीभूत असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे.



# आईच्या स्मृतिदिनी बालगृहास भोजनदान

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** राज्य कामगार विमा योजना रुग्णालयातील कर्मचारी सुरेश नारायण पाटील यांनी आईच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त तिथीप्रमाणे (दि. 6 नोव्हें. 2023) धार्मिक विधींना फाटा देत छत्रपती संभाजीनगर  येथील बाबासाई बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या मुलामुलींचे बालगृहास भोजनदानासाठी निधी देऊन प्रथम स्मृतीदिन साजरा केला.  सुरेश नारायण पाटील यांच्या मातोश्री मनोरमा नारायण पाटील यांचे मागील वर्षी दि. 18  नोव्हेंबर 2022 रोजी दुःखद निधन झाले होते. आईचा प्रथम स्मृतिदिन तिथीप्रमाणे  धार्मिक विधींना फाटा देत साजरा करण्याची इच्छा व्यक्त करीत सुरेश पाटील, सौ. मीनाक्षी सुरेश पाटील, प्रतिक आणि अथर्व पाटील यांनी बाबासाई बहुद्देशीय सेवाभावी संस्थेच्या मुलामुलींचे बालगृहास भेट देत भोजननिधी  संस्थेचे अध्यक्ष नितीन वाकुडे यांच्याकडे सुपूर्द केला. या बालगृहात जवळपास 30 मुले- मुली आहेत. यावेळी पाटील कुटुंबाच्या कार्याचे बाबासाई संस्थेकडून कौतुक करण्यात आले.



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in